सोमवार, २९ नोव्हेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक १३२
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## त्रिपुरात भाजपचा बोलबाला; आगरतळा मनपात निर्भेळ यश



**आगरतळा** : आगरतळा महानगरपालिका आणि त्रिपुरातील इतर नागरी संस्थांच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. राज्यातील आठही जिल्ह्यांतील १३ केंद्रांवर २००हून अधिक जागांसाठी रविवारी (दि. २८) मतमोजणी झाली. भाजपने ११२ जागा बिनविरोध जिंकल्या होत्या, तर उर्वरित मतदान झालेल्या २२२ जागांपैकी २१७ जागांवर विजय मिळविला. सीपीआय(एम)ला तीन, तर टीएमसी व टिप्रा मोथाला प्रत्येकी एक जागा जिंकता आली. आगरतळा महानगरपालिकेच्या सर्व ५१ प्रभागांत भाजपचा विजय झाला. सामान्य सुरक्षा व्यवस्थेव्यतिरिक्त त्रिपुरा राज्य रायफल्स आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दलदेखील मतमोजणी केंद्रांलगतच्या भागात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तैनात होते.

अंतरंग
दोन वर्षांत महाराष्ट्र २० वर्षे मागे -दरेकर/२
‘माणगाव नगरपंचायत भाजप स्वबळावर लढणार’/५
पहिला कसोटी सामना रंगतदार अवस्थेत/६

# हा तर तीन पक्षांचा तमाशा!

## भाजप नेते आशिष शेलारांची आघाडी सरकारवर टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील महाविकास आघाडी सरकारला रविवारी (दि. २८) दोन वर्षे झाली. यानिमित्त भाजप नेते आमदार ॲड. आशिष शेलार यांनी प्रदेश भाजप कार्यालयात पत्रकार परिषद घेत हे सरकार म्हणजे तीन पैशांचा तमाशा या नाटकाप्रमाणे तीन पक्षांचा तमाशा असल्याचा टोला लगावला.



ॲड. आशिष शेलार म्हणाले की, मला कुणावर वैयक्तिक टीका करायची नाही, तसेच आज कोणता आरोपही करायचा नाही. आजचा दिवस खऱ्या अर्थाने वेदनांच्या प्रगटीकरणाचा दिवस आहे. असंख्य वेदना महाराष्ट्राला आणि महाराष्ट्रातील जनतेला गेल्या दोन वर्षांपासून भोगाव्या लागल्या त्या मांडत आहोत. सत्ता संपत्ती मिळविण्यासाठी अमानवी, अमानुष प्रयत्न केला गेला. हे सरकार जनता केंद्रित होण्यापेक्षा पुत्र, पुत्री आणि पुतण्या याभोवती केंद्रित झालेले आहे. ही वेदना आम्ही मांडतो आहे.

आपला पुत्र राजकारणात स्थिरावला पाहिजे यात चूक नाही, पण राज्यात निर्णय काय घेतले हे पाहिले तर महाराष्ट्राची बदनामी झाली असल्याचे दिसते. राज्याची जगासमोर जी प्रतिमा गेली ती पब, पेग, पार्टी आणि पेंग्विन अशीच दुर्दैवीपणे गेली. मग जेव्हा मुंबईकर लोकल ट्रेन सुरू करा, असे म्हणत होते तेव्हा पब आणि बार सुरू केले गेले. जेव्हा मंदिर उघडा, अशी मागणी झाली तेव्हा मदिरालये उघडी केली, असे निर्णय पुत्रप्रेमाने झाले असे सांगून ॲड. शेलार म्हणाले की, सुपुत्रीच्या प्रेमापोटी गृहमंत्रीपदी अनिल देशमुख यांना बसवले. त्यानंतर महाराष्ट्राची बदनामी करणारे वसुली, मटका किंग, बुकी यांच्यासोबत व्यवहार, पोलीस दलात गटबाजी, बदल्यांमधील भ्रष्टाचार असे चित्र समोर आले. महाराष्ट्राची ही वेदना आहे. (पान २ वर..)

### राज्यात मोगलाई अवतरलीय -चंद्रकांत पाटील



**पुणे** : ठाकरे सरकारच्या दोन वर्षांत भ्रष्टाचार व गोंधळामुळे राज्यात प्रशासन कोसळले आहे. खुलेआम मोगलाई अवतरली आहे. सरकारचे शेतकरी, महिला, ओबीसी, मराठा, धनगर, अनुसूचित जाती-जमाती, विद्यार्थी, कामगार अशा कोणाकडेच लक्ष नाही. कोविडसह सर्व विषयांत हे सरकार अपयशी ठरले आहे. संधी मिळाली तर राज्यातील जनता या सरकारला फेकून देईल, अशी टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी केली आहे. पाटील यांनी रविवारी (दि. २८) पत्रकार परिषद घेऊन ठाकरे सरकारचा पंचनामा केला. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

# पनवेलमध्ये महिलांचा भाजपत जाहीर प्रवेश

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष तथा कार्यतत्पर आमदार प्रशांत ठाकूर यांचे सक्षम नेतृत्व व कार्यप्रणालीवर प्रभावित होऊन आणि भाजप पनवेल शहर सरचिटणीस व नगरसेवक नितीन पाटील यांच्या सामाजिक कार्याने प्रेरित होऊन महापालिका प्रभाग १८मधील प्रसाद म्हात्रे यांच्या पुढाकाराने असंख्य महिलांनी शनिवारी (दि. २७) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर व अन्य मान्यवरांनी स्वागत केले.



भाजपच्या पनवेल येथील मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर व नगरसेवक नितीन पाटील यांच्यासह भाजप पनवेल महिला मोर्चा शहर मंडल उपाध्यक्ष सुहासिनी केकाणे, खजिनदार अदिती मराठे, सोशल मीडिया शहर सेल संयोजक प्रसाद हनुमंते, संजीवनी खिल्लारे, स्वाती पवार, तसेच प्रभाग क्रमांक १८मधील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी प्रभाग १८मधील स्नेहा सूर्यकांत पंडित, जयश्री किशोर म्हात्रे, सपना निलेश पाटील, श्वेता जितेकर, सुभद्रा पाटील, गीता रावल, अमृता सावळेकर, स्नेहल शिरढोणकर, एकता रावल, प्राची मानकामे, कश्मिरा शिरढोणकर, सविता सनी बागडी, चेतना रूपेश तुपे, सीमा अजय रावल, निरू जयंतभाई रावल, सुलोचना चंद्रकांत म्हात्रे, उशा राजेश सुर्वे, आशा उत्तम दळवी, राधाबाई किसन सुर्वे, आरती रावल यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या सर्वांचे स्वागत करण्यात आले.





अभिवादन!

सातारा : रयत शिक्षण संस्थेच्या यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्युट ऑफ सायन्स येथे थोर समाजसुधारक, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त ‘रयत’चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रविवारी अभिवादन केले. या वेळी ‘रयत’चे चेअरमन डॉ. अनिल पाटील, व्हाईस चेअरमन ॲड. भगिरथ शिंदे, सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, सहसचिव संजय नागपुरे, ऑडिटर प्राचार्य शिवलिंग मेनकुदळे, प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, प्राचार्य डॉ. बी. सी. जाधव उपस्थित होते.



## निवडक

### मृतदेह घेऊन निघालेल्या गाडीला अपघात; १८ ठार

**कोलकाता** : अंत्यविधीकरिता मृतदेह घेऊन जाणाऱ्या वाहनाने ट्रकला धडक दिल्याने १८ लोकांचा मृत्यू झाला असून २३ लोक जखमी झाले आहेत. पश्चिम बंगालमधील नदियात हांसखाली येथील फुलबाडी परिसरात शनिवारी रात्री हा भीषण अपघात झाला. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. धुके असल्यामुळे आणि वाहनाचा वेग जास्त असल्याने हा अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे.

### ‘ओमिक्रॉन’च्या पार्श्वभूमीवर खबरदारी घेण्याचे आवाहन

**नवी दिल्ली** : कोरोनाचा नवा ओमिक्रॉन व्हेरियंट आढळल्याच्या पार्श्वभूमीवर जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) मुख्य शास्त्रज्ञ डॉ. सौम्या स्वामीनाथन यांनी नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. मास्क तुमच्या खिशातील लस असल्याचे त्यांनी म्हटले आहे. ‘ओमिक्रॉन’बाबत अद्याप अधिकृतपणे काही सांगता येत नसले तरी हा प्रकार डेल्टापेक्षा जास्त संसर्गजन्य असू शकतो, असेही त्या म्हणाल्या.

# सत्तेत नव्हे; तर सेवेत राहायचेय

## पंतप्रधान मोदींची ‘मन की बात’

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. २८) मन की बात कार्यक्रमातून देशातील जनतेशी संवाद साधला. या वेळी त्यांनी मला सत्तेत नाही, तर केवळ सेवेत राहायचे आहे, असे म्हटले.

‘मन की बात’मध्ये राजेश कुमार प्रजापती या रुग्णाने पंतप्रधान मोदींचे आयुष्मान भारत योजनेसाठी कौतुक करताना त्यांना कायम सत्तेत राहण्याच्या शुभेच्छा दिल्या. तुमचे आयुष्य इतके मोठे असो की कायम सत्तेतच राहो. माझ्या कुटुंबातील लोकही तुमच्यावर खूप खूश आहेत, असे प्रजापती यांनी म्हणत पंतप्रधानांचे कौतुक केले. यावर मोदी म्हणाले की, राजेशजी तुम्ही मला सत्तेत राहण्याच्या शुभेच्छा देऊ नका. मी आजही सत्तेत नाही आणि भविष्यातही सत्तेत जायची इच्छा नाही. मला केवळ सेवेत राहायचे आहे. माझ्यासाठी पंतप्रधानपद या सर्व गोष्टी सत्तेसाठी नाहीच, तर सेवेसाठी आहेत.

लोकांना आयुष्मान भारत योजनेची माहिती नसते. तुमच्या



आजूबाजूला जितकी गरीब कुटुंब आहेत त्यांना तुम्हाला आयुष्मान भारत योजनेची कशी मदत झाली याची माहिती द्या, तसेच त्यांनाही असे कार्ड बनवण्यास सांगा, जेणेकरून त्यांच्या कुटुंबात काही संकट आले तर त्यांना मदत होईल. आज गरिबाला औषधांशिवाय अडचण यावी हे योग्य नाही. पैशांमुळे गरिबांना औषधे घेता न येणे किंवा उपचार न मिळणे ही काळजी करण्यासारखी गोष्ट आहे. त्यामुळे अशा गरिबांना मदत करा आणि घराघरात ही माहिती द्या, असे आवाहन या वेळी पंतप्रधान मोदींनी केले.

नरेंद्र मोदी म्हणाले, पंचायतीपासून संसदेपर्यंत सर्वत्र अमृत महोत्सवाचा गाजावाजा सुरू आहे आणि या उत्सवाशी जोडलेले कार्यक्रम सतत सुरू आहेत. येत्या १६ डिसेंबर रोजी आपला देश १९७१च्या युद्धाचे सुवर्णजयंती वर्ष साजरे करीत आहे. या सर्व दिनविशेषांनिमित्त मी देशाच्या संरक्षण दलांचे स्मरण करतो, आपल्या वीरांचे स्मरण करतो आणि विशेष म्हणजे अशा वीरांना जन्म देणाऱ्या वीरमातांचे स्मरण करतो.

आपल्या आजूबाजूला जे नैसर्गिक स्रोत आहेत ते आपण जपले पाहिजेत, त्यांना पुन्हा मूळ स्वरूपात आणले पाहिजे. यातच आपल्या सर्वांचे हित आहे, जगाचे हित आहे. जेव्हा आपण निसर्गाचे रक्षण करतो त्या बदल्यात निसर्गही आपले संरक्षण करतो, आपल्याला सुरक्षा प्रदान करतो. अनेकदा वैयक्तिक आयुष्यातही आपल्याला हे अनुभवता येते, असेही पंतप्रधान मोदींनी नमूद केले.

# निसर्गाकडे चला, तंदुरुस्त राहा!

## खारघर हिल ट्रेकिंग; सभागृह नेते परेश ठाकूर यांचा सहभाग

**खारघर : रामप्रहर वृत्त**

येथील नगरसेवक प्रवीण पाटील यांच्या स्पोर्ट्स वेल्फेअर असोसिएशनच्या माध्यमातून निसर्गाकडे चला व तंदुरुस्त राहा ही संकल्पना राबवित दर महिन्याला खारघर हिलवर ट्रेकिंगचे आयोजन करण्यात येते. नोव्हेंबर महिन्यातील मोहीम रविवारी (दि. २८) राबविण्यात आली. या मोहिमेत पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सहभाग घेत नागरिकांना प्रोत्साहन दिले.

या उपक्रमाला लहान मुले, महिला, युवक, तसेच ज्येष्ठ नागरिक अशा सुमारे दीडशेच्यावर नागरिकांनी सहभाग घेऊन उत्तम प्रकारे प्रतिसाद दिला. या वेळी दर महिन्याला नगरसेवक प्रवीण पाटील यांच्या स्पोर्ट्स वेल्फेअरसोबत खारघर हिल्सवर



ट्रेकला येण्याचे आश्वासन नागरिकांनी दिले. या उपक्रमाबद्दल नगरसेवक प्रवीण पाटील यांनी व्यायामाचे विविध प्रकार व चालण्याचे महत्त्व याविषयी आपले मत व्यक्त केले.

पनवेल महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सर्व सहभागी नागरिकांचे तसे नगरसेवक प्रवीण पाटील यांनी राबविलेल्या स्तुत्य अभियानाचे कौतुक केले. कोरोनावर आपण यशस्वी मात केलेली असली, तरी भविष्यातील येणाऱ्या संभाव्य धोक्याला तोंड देण्यासाठी असे उपक्रम राबविणे गरजेचे असल्याचे मत परेश ठाकूर यांनी व्यक्त केले.

खारघर हिल्स ट्रेकिंगवेळी नगरसेवक रामजी बेरा, हरेश केणी, भाजप खारघर मंडल सरचिटणीस दीपक शिंदे, जिल्हा चिटणीस गीता चौधरी, ज्येष्ठ नागरिक सेलचे संयोजक नवनीत मारू, वैशाली प्रजापती, अंजुबेन पटेल, निर्मला यादव, सचिन वासकर, गुरुनाथ म्हात्रे, विशाल नाईक, शुभ पाटील आदी उपस्थित होते.

## ठाण्यातील वृद्धाश्रमात तब्बल ६७ जणांना कोरोनाची लागण

**ठाणे : प्रतिनिधी**

ठाणे जिल्ह्यातील भिवंडीजवळील खडवली येथे असलेल्या मातोश्री वृद्धाश्रमातील ६७ वृद्धांना कोरोनाची लागण झाल्याची माहिती समोर आली आहे. या सर्वांना ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली. विशेष म्हणजे या सर्वांचे कोरोना लसीकरणही झाले आहे.

या वृद्धाश्रमातील एका कर्मचाऱ्याच्या मुलीला ताप आल्यानंतर त्या कर्मचाऱ्यालाही थोडी कणकण जाणवली. त्यानंतर कोरोनाचा प्रसार झाल्याचे सांगण्यात येत आहे.

पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी




पनवेल महानगरपालिका हद्दीत
सोमवार, दि. २९ नोव्हेंबर २०२१ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड
सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)
१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
३. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
६. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, से.२
(सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.)
७. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
८. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
९. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
१०. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
११. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
१२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
१३. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
१४. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
१५. सेंट्रल रेल्वे, पनवेल

कोवॅक्सिन
सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)
१. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
२. पनवेज जिमखाना
३. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

पनवेल ग्रामीण लसीकरण
- पडघे रा.जि.प. शाळा
- खिडूकपाडा रा.जि.प. शाळा
- खारघर गाव रा.जि.प. शाळा
- कोपरा समाज मंदिर
- काळुंद्रे रा.जि.प. शाळा
- घोट रा.जि.प. शाळा - (म्हात्रे पाडा/गोंधळी पाडा/मढवी पाडा/वाघाची वाडी)
- धामोळे पाडा रा.जि.प. शाळा
- खुटारी/एकटपाडा रा.जि.प. शाळा
- किरवली/आडीवली रा.जि.प. शाळा
- धरणा रा.जि.प. शाळा

# राज्यात मोगलाई अवतरलीय

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांचा हल्लाबोल

**पुणे : प्रतिनिधी**

ठाकरे सरकारला दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. या दोन वर्षांत भ्रष्टाचार व गोंधळामुळे राज्यात प्रशासन कोसळले आहे. खुलेआम मोगलाई अवतरली आहे. सरकारचे शेतकरी, महिला, ओबीसी, मराठा, धनगर, अनुसूचित जाती-जमाती, विद्यार्थी, कामगार अशा कोणाकडेच लक्ष नाही. कोविडसह सर्व विषयात हे सरकार अपयशी ठरले आहे. संधी मिळाली तर राज्यातील जनता या सरकारला फेकून देतील, अशी टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी केली.



चंद्रकांत पाटील यांनी पुण्यात रविवारी (दि. २८) पत्रकार परिषद घेऊन ठाकरे सरकारचा पंचनामा केला. या वेळी त्यांनी ठाकरे सरकारवर जोरदार हल्ला चढवला. महाविकास आघाडीच्या बेफिकीरीमुळे आणि भ्रष्टाचारामुळे राज्यातील प्रशासन कोसळले आहे. राज्याच्या एका पोलीस आयुक्तांनी गृहमंत्र्यांवर शंभर कोटी वसुलीचा आरोप केला. त्यानंतर उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सीबीआयने चौकशी सुरू केली. न्यायालयाच्या आदेशानंतर गृहमंत्र्यांनी राजीनामा दिला आणि बरेच दिवस ते परागंदा होते. आरोप करणारे पोलीस आयुक्तही परागंदा होते. मंत्रिमंडळातील अनेक मंत्री चौकशीच्या फेऱ्यात आहेत, असे पाटील म्हणाले.

सचिन वाझे यांना खंडणीवसुलीचा आदेश दिला असा आरोप केला गेला आहे. त्या सचिन वाझे यांना सोळा वर्षांच्या निलंबनानंतर आणि उच्च न्यायालयाची प्रतिकूल टिप्पणी असतानाही परत पोलीस खात्यात सेवेत दाखल करून घेतले. वाझे यांना परत सेवेत घेण्याची सर्व जबाबदारी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचीच आहे, असेही त्यांनी सांगितले.

या सरकारने मराठा आरक्षण गमावले आणि ते पुन्हा लागू होण्यासाठी काहीही हालचाल केली नाही. ओबीसींच्या राजकीय आरक्षणासाठी अध्यादेश काढला तरी त्याला उच्च न्यायालयात आव्हान मिळाले आहे. त्याही आरक्षणाची अनिश्चितता आहे. सुमारे एक लाख कर्मचाऱ्यांच्या एसटीचा संप चालूच आहे. सरकारचे शेतकऱ्यांकडे लक्ष नाही. महिलांवरील अत्याचार वाढले आहेत. अनुसूचित जाती जमातींच्या पदोन्नतीतील आरक्षणाचा घोळ आहे. शाळा महाविद्यालयांच्या वेळापत्रकाचा गोंधळ आहे. या सरकारचे कोणत्याही समाज घटकाकडे लक्ष नाही आणि कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही. गेल्या दोन वर्षांत या सरकारने घेतलेल्या अनेक निर्णयावरून त्यांना न्यायालयाने फटकारले आहे, असे सांगत पाटील यांनी ठाकरे सरकारच्या अपयशाची जंत्रीच सादर केली.

मुख्यमंत्री मदत निधीत कोरोनासाठी सहाशे कोटी शिल्लक आहेत. पण राज्य सरकार खर्च करत नाही. दुसरीकडे कोरोनाच्या बाबतीत सर्व काही केंद्रावर ढकलले जात आहे. महाविकास आघाडी सरकारला दारुवरचा कर कमी करता येतो. तर पेट्रोल डिझेलवरचा का कमी करता येत नाही, असा सवालही त्यांनी केला.

### मुख्यमंत्रिपदाचे काम ठप्प

***मुख्यमंत्री उद्धव ठाकरे लवकरात लवकर बरे व्हावेत आणि पुन्हा कार्यरत व्हावेत यासाठी आपण त्यांना शुभेच्छा देतो, परंतु त्यांनी आपला पदभार अन्य कोणाकडे सोपविलेला नाही. त्यामुळे गेले १९ दिवस मुख्यमंत्रिपदाचे काम ठप्प आहे. गेले १० महिने विधानसभेला अध्यक्ष नाही. अशा प्रकारे सरकार चालू शकत नाही, असेही त्यांनी सांगितले.***





**पनवेल : सर्व प्रकारचे क्रीडासंबंधी साहित्य मिळणाऱ्या दुकानाचे उद्घाटन महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी दुकानाचे मालक विशाल जितेकर, तेजल जितेकर, परेश घरत, विरेन गावंड, अभिषेक जगताप, सौरभ ठोकळ, विजू गायकवाड आदी उपस्थित होते.**



**पनवेल : कामगार नेते दिवंगत श्याम म्हात्रे यांची कन्या श्रुती म्हात्रे यांना वाढदिवसानिमित्त महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.**

## महाविश्वासघाती आघाडी

### भाजप नेते प्रकाश जावडेकर यांचा टोला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

उद्धव ठाकरे सरकारला दोन वर्षे पूर्ण झाली. मी आज या आघाडीचे महाविश्वासघाती आघाडी असे नामकरण करतो, असा टोला माजी मंत्री तथा भाजप नेते प्रकाश जावडेकर यांनी महाविकास आघाडी सरकारला लगावला आहे. ते रविवारी (दि. २८) एएनआय वृत्तसंस्थेशी बोलत होते.



जावडेकर यांनी ठाकरे सरकारच्या दोन वर्षांच्या कामवार जोरदार टीका केलीय. जावडेकर यांनी उद्धव ठाकरेंना अपघाताने झालेले मुख्यमंत्री म्हणत टीकास्त्र सोडले.

राज्य सरकारला दोन वर्ष पूर्ण झाली, पण केंद्राने केलेली कामेही त्यांनी आपल्या खात्यात मांडली, असा आरोपही जावडेकरांनी केला आहे.

ते पुढे म्हणतात, या सरकारला महाविकास आघाडी म्हटले जाते, मात्र दोन वर्षांतील त्यांचे कर्तृत्व पाहिल्यानंतर लोकांनी तिला महावसुली आघाडी असे नाव ठेवले आहे. मी आज या आघाडीचे महाविश्वासघाती आघाडी असे नामकरण करतो. इतके भ्रष्ट, बेकार आणि संधीसाधू सरकार महाराष्ट्राने आजपर्यंत पाहिले नाही, अशी टीकाही जावडेकरांनी या वेळी केली.

## दोन वर्षांत महाराष्ट्र २० वर्षे मागे

### विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांची ठाकरे सरकारवर टीका



**नाशिक : प्रतिनिधी**

महाविकास आघाडी सरकारच्या दोन वर्षांच्या काळात राज्य २० वर्षे मागे गेल्याचा घणाघाती आरोप विधान परिषद विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी केला. ते रविवारी (दि. २८) पत्रकार परिषदेत बोलत होते.

आघाडी सरकारला दोन वर्षे पूर्ण झाले असताना दरेकरांनी राज्य सरकारवर मोठे आरोप केले. ते म्हणाले की, आपण पाच वर्षांचा फडणवीसांचा विकासाचा कार्यकाळ बघितला त्या काळात भ्रष्टाचाराचा एकही डाग सरकारने लावून न घेता काम केले, मात्र महाविकास आघाडी सरकारच्या दोन वर्षाच्या काळात राज्य २० वर्षे मागे गेला आहे. या काळात राज्यात सुरू असणारे प्रकल्प ठप्प झाले, तसेच अर्ध्या मंत्रिमंडळावर डाग आहेत. राज्यात कायदे व्यवस्थेबद्दल बोलताना ते म्हणाले की, ठाकरे सरकारच्या दोन वर्षाच्या काळात चालू प्रकल्प ठप्प झाले. गुन्हेगारीत महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर आला. ही महाविकास आघाडीची उपलब्धी आहे.

भाजपच्या मंडल अध्यक्षाची खुलेआम हत्या झाली, ती राजकीय आशीर्वादाने सांगत नाशिक गुन्हेगारी नगरी होते का, अशी भीती नाशिककरांना वाटत असल्याचे दरेकर या वेळी म्हणाले.

## 'वीर सावरकर'चे आज प्रकाशन

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्रीय माहिती आयुक्त उदय माहुरकर आणि श्री चिरायु पंडित यांनी लिहिलेल्या वीर सावरकर द मॅन हू कुड हॅव प्रिव्हेंटेड पॅरेशन या रूपा पब्लिकेशनने प्रकाशित केलेल्या ग्रंथाचे प्रकाशन विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोमवारी (दि. २९) दुपारी ४ वाजता होणार आहे.

मुंबईच्या दादर शिवाजी उद्यान येथील स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात हा प्रकाशनाचा कार्यक्रम होणार आहे.

## नवीन पनवेलमध्ये संविधान दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदिवासी संघर्ष समिती रायगड आणि रायगड व ठाणे असंघटीत कामगार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच एससी, एसटी, ओबीसी, एनटी अॅण्ड मायनॉरटी पुरस्कृत संविधान दिन साजरा करण्यात आला. नवीन पनवेल येथील राजीव गांधी मैदानावर झालेल्या या कार्यकमास शेकडो नागरिक उपस्थित होते.



या वेळी व्ही. एस. कांबळे व प्राचार्य डोंगरगावकर, गौतम बिल्डर व एकविरा बिल्डरचे मालक प्रभाकर सोनावणे, समीर पाटील, मंगेश कांडपिळे उपस्थित होते. सभेचे प्रास्ताविक संघटनेचे सल्लागार अॅड. मानवेंद्र वैदूसर यांनी केले. संघटनेचे अध्यक्ष विकास घरत यांनी या वेळी भाषणात सिडकोचा नैना प्रकल्पातून शेतकऱ्यांसाठी फसवणूक होत असल्याची भावना व्यक्त केली, तसेच स्थानिक आस्थापनांसह नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी होणाऱ्या नोकर भरतीमध्ये स्थानिक प्रकल्पग्रस्त व आदिवासी समाजाला प्राधान्य दिले पाहिले, असे सांगितले. संघटनेचे सचिव एम. सी. गवई यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

यानंतर उपस्थितांना जय भीम हा चित्रपट दाखविण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघटनेच्या महिला अध्यक्ष पुष्पांजली सकपाळ यांनी केले.

## फुंडे हायस्कूलमध्ये संविधान दिन साजरा

**उरण :** रयत शिक्षण संस्थेच्या फुंडे येथील तु. ह. वाजेकर विद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. या वेळी उपमुख्याध्यापक नरवडे, पर्यवेक्षक जी. सी. गोडगे, ज्युनिअर कॉलेज प्रमुख व्ही. के. कुटे, सांस्कृतिक विभागप्रमुख एच. एन. पाटील आणि दर्शना माळी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन केले. या वेळी वर्गशिक्षकांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व आणि शहीद दिनाविषयी माहिती सांगितली.



## गुळसुंदेत दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गाडगीळ गुरुजी सामाजिक व शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून गुळसुंदे येथील तुंगारतन विभाग विद्या मंदिर येथे बुधवारी (दि. २४) दहावीच्या विद्यार्थांसाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.



या वेळी सुहास जावडेकर यांनी विद्यार्थ्यांना त्यांची स्मरणशक्ती कशी वाढवावी या विषयावर मार्गदर्शन केले व साध्या प्रयोगातून हे कसे साध्य होईल यावर त्यांनी विशेष मार्गदर्शन केले, तसेच त्यानी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्रामधील एक प्रसंग साभिनय सादर केला. आतापर्यंत त्यांनी जवळपास दोन हजार व्याख्याने दिलेली आहेत. ज्यामध्ये त्यांनी सावरकर, लोकमान्य टिळक, वासुदेव बळवंत फडके, शिवचरित्र यांसारखे विषय हाताळले आहेत. शिवथरघळ येथे ते गेले २५ वर्षे मुलांना संस्कार शिबिरातून मार्गदर्शन करीत आहेत. यासोबत रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीत अनेक व्याख्याने त्यांची आयोजित झाली आहेत.

गो. नी. दांडेकर, बाबासाहेब पुरंदरे यासारख्या आदर्श व्यक्तींबरोबर अनेक वर्षे त्यांनी काम केलेले आहे. माजी केंद्रीय मंत्री व भाजप नेते प्रकाश जावडेकर यांचे ते कनिष्ठ बंधू आहेत. असे चतुरस्र, ऋषितूल्य व्यक्तिमत्त्व शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शनास लाभले याबद्दल शाखेचे मुख्याध्यापक कांबळे यांनी आभार मानले.

या कार्यक्रमास गाडगीळ गुरुजी सामाजिक व शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मिनेश गाडगीळ, स्थानिक सल्लागार समिती अध्यक्ष आर. डी. पाटील, तसेच सदस्य सखाराम पाटील व मिलिंद वैद्य, तसेच दर्शन कोळी व शिक्षकवर्ग उपस्थित होता.

पान १ वरून

### हा तर तीन पक्षांचा तमाशा!

पुतण्या प्रेमाने त्यांना पुतण्याला सरकारमध्ये महत्त्वाचे स्थान द्यावे लागले. पुतण्याचे काय उद्योग सांगावे? एक हजार कोटींची बेनामी संपत्तीची माहिती केंद्रीय तपास यंत्रणांनी उघड केली. कुठून आली संपत्ती? सहकारी कारखाना उघडायचा, सरकारकडून जमीन, वीज सगळे सवलतीत मिळवायचे, शेतकऱ्यांकडून पैसा घ्यायचा, पण कारखाना तोट्यात दाखवायचा. बँकेने मग लिलाव करायचा, मग तोच कारखाना पुतण्याने विकत घ्यायचा, असे पुतण्याचे नवीन उद्योग समोर आले.

या सरकारमध्ये सामान्य माणसाचे भले झाले नाही. अहंकार, अतर्क, असंवेदनशील कार्यपद्धती सरकारची दोन वर्षे राहिली. पेट्रोलवरील कर कमी करा, अशी मागणी केली तर विदेशी दारूवरील कर कमी केला. वायनरीला सबसिडी दिली, पण शेतकऱ्यांबाबत काही बोलायला तयार नाही. २० वर्षांपूर्वीच्या कार्यक्रमाचा एका एजन्सीला पैसा दिला गेला, पण एसटीच्या कामगाराला द्यायला तयार नाही. शाळा बंद, मात्र फी वाढवली जाते. सरपंचाची निवडणूक थेट जनतेतून घेण्याचे बंद केले जाते. शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजार समिती मतदानाचा हक्क काढून घेतला जातो लोकशाहीला मारक असे हे निर्णय का घेतले जातात? हे सगळे तर्कात न बसणारे आहे, असेही अॅड. शेलार यांनी नमूद केले.

#### *असंवेदनशील सरकार*

*बांधावर जाऊन शेतकऱ्यांना ५० हजार देऊ म्हणणारे १० हजारची घोषणा केली तेही देऊ शकले नाहीत. एफआरपीसाठी आंदोलने झाली, पण हे सरकार तीन टप्प्यात एफआरपी नको म्हणते. कोरोना काळात देशाचे अर्थचक्र ज्या शेतकऱ्यांनी चालवले त्या शेतकऱ्यांची वीज जोडणी तोडली जात आहे. महिला अत्याचाराच्या बाबतीत तर अत्यंत असंवेदनशीलपणा दिसतो. गेल्या सात महिन्यांत मुंबईत ५५० बलात्काराचे गुन्हे नोंदवले गेलेत. बाकी पक्षाचे मंत्री, युवा संघटनेचे पदाधिकारी, मंत्री राजीनामा हे विषय सगळ्यांना माहिती आहेच. शक्ती कायदा कुठे आहे, असा सवाल करीत आमदार अॅड. आशिष शेलार यांनी अकरावीचे प्रवेश कधी संपणार? मराठा समाजाचे आरक्षण सरकारला न्यायालयात टिकवता आले नाही. भूमिका काय? ओबीसी राजकीय आरक्षण सरकारला न्यायालयात टिकवता आले नाही. सरकार काय करणार? अशा प्रत्येक आघाडीवर सरकार असंवेदनशील वागतेय या आमच्या वेदना आहेत, असे म्हटले.*

## शिल्पा बारसिंग यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**सातारा : प्रतिनिधी**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त कटगुण (ता. खटाव) येथे रविवारी (दि. २८) झालेल्या कार्यक्रमात शिल्पा देवेंद्र बारसिंग यांना सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष उदय सदाशिव कबुले यांच्या हस्ते तालुका स्तरावरील आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

शिल्पा बारसिंग या सध्या ढोकळवाडी (ता. खटाव) येथे शिक्षिका म्हणून कार्यरत असून त्यांनी कोरोना महामारीच्या काळात विद्यार्थ्यांच्या घरोघरी जाऊन विविध प्रकारे शालेय शिक्षण देण्याचे काम केले, तसेच त्यांनी महिला बचत गटाच्या माध्यमातून माहुली गावात अनेक उपक्रम राबविले आहेत. या कार्याची दखल घेत बारसिंग यांना सन्मानित करण्यात आले.

सांगलीतील विटा येथील मनमंदिर बँकेचे व्यवस्थापक भूपेंद्र बाबूराव बारसिंग यांचे लहान बंधू व माहुली ग्रामपंचायतीचे सदस्य डॉ. देवेंद्र बारसिंग यांच्या शिल्पा या पत्नी असून मिळालेल्या या आदर्श शिक्षक पुरस्काराबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.





## पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंग यांचा नागरिकांशी संवाद

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबईचे पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंग यांनी कळंबोली पोलीस ठाण्याला भेट दिली. या वेळी त्यांनी कळंबोलीवासीयांशी सुसंवाद साधत त्यांच्या अडीअडचणी त्याचप्रमाणे पोलीस खात्यामार्फत सर्वसामान्य नागरिकांशी कसा संवाद साधला जातो याची माहिती त्यांनी घेतली.

प्रथमतः सिंग यांनी कळंबोली पोलीस स्टेशनची वार्षिक तपासणी केली. पोलीस ठाण्याचा परिसर व संबंधित सर्व बाबींची तपासणी करून पोलीस आयुक्तांनी कळंबोली पोलीस ठाण्याविषयी समाधान व्यक्त करून निरीक्षक संजय पाटील यांचे कौतुक केले. या तपासणीदरम्यान पोलीस आयुक्तांनी पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांचा दरबार घेऊन त्यांच्या असणाऱ्या अडीअडचणी ऐकून घेतल्या.

या वेळी पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनवणे उपस्थित होते. या तपासणीदरम्यान आयुक्तांनी कळंबोलीमधील नागरिकांशी संवाद साधला. या वेळी जवळपास शेकडो नागरिक उपस्थित होते. आयुक्तांनी कळंबोली पोलीस ठाण्यासंदर्भात नागरिकांच्या सूचना व हरकती विचारल्या, तसेच कळंबोली पोलीस ठाण्यासंदर्भात काही तक्रारी असल्यास सांगण्याचे आवाहन पोलीस आयुक्तांनी कळंबोलीकरांना केले.

## निवडक

### एक्स्प्रेस वेवर अपघातात एकाचा मृत्यू

**पनवेल :** भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनाने एका ४० वर्षीय व्यक्तीस ठोकर मारून त्यात त्याला जखमी केले. यात त्याचा मृत्यू झाल्याने या व्यक्तीच्या नातेवाइकाचा शोध पनवेल तालुका पोलीस घेत आहेत. पनवेलजवळील मुंबई-पुणे एक्सप्रेस वे, पुणे लेन ७/४५५ किमी वर एका अनोळखी वाहनाने एका व्यक्तीस ठोकर मारली. हा मयत व्यक्ती निमगोरा, उंची अंदाजे पाच फूट दोन इंच असून अंगात लाल टीशर्ट त्यावर पांढऱ्या आडव्या पट्ट्या व राखाडी रंगाची फूल पॅन्ट घातली आहे. या मयत व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे २७४५२४४४ किंवा सहा पोलीस निरीक्षक विवेक भोईर यांच्याशी संपर्क साधावा.

### रिपब्लिकन पार्टीतर्फे साड्यांचे वाटप



**पनवेल :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीच्या वतीने संविधान दिनाचे औचित्य साधून जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी पनवेल परिसरातील जवळपास ४००च्या वर माता-भगिनींना साड्यांचे वाटप केले. या वेळी पनवेल तालुका व पनवेल शहर कार्यकारिणीची नव्याने निवड करण्यात आली, तसेच त्यांना जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. यासोबत ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यासंदर्भात सर्व पदाधिकाऱ्यांची बैठक झाली आहे. या कार्यक्रमाला उद्योजक राजू ठकेकर, तालुकाध्यक्ष नरेश परदेशी, शहराध्यक्ष अविनाश अडांगळे, पनवेल तालुका उपाध्यक्ष दिलीप नाईक, शहर उपाध्यक्ष भारत दाताड, शहर संघटक समाधान कांबळे, उपसंघटक शशिकांत कळवेकर, नवीन पनवेल शहराध्यक्ष दीपक रोडके, उपाध्यक्ष अशोक कदम, शहर महिला आघाडी अध्यक्षा ममताज पठाण आदी उपस्थित होते.

### खारघरमध्ये सुरक्षा रक्षकाकडूनच घरफोडी

**पनवेल :** खारघर वसाहतीमध्ये एका सुरक्षा रक्षकानेच बंद घरातील रोख रक्कम व दागिने असा जवळपास दोन लाख ३२ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे. खारघर वसाहतीमधील सेक्टर २१ येथील ग्रामविकास भवनजवळ असलेल्या बन्सल हाऊसमधील सदस्य कुलविंदरसिंग बन्सल व इतर कुटुंबीय घराबाहेर कार्यक्रमानिमित्त गेले होते. या वेळी सुरक्षा रक्षकाने घरातील रोख रक्कम व दागिने असा जवळपास दोन लाख ३२ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### गतिमंद मुलीच्या नातेवाईकांचा शोध

**पनवेल :** एका गतिमंद मुलीच्या नातेवाईकांचा शोध



सीबीडी पोलीस करीत आहेत. या मुलीचे नाव रोहिणी कालिदास (वय २०) असे असून ती अंगाने सडपातळ, रंग काळा, चेहरा गोल, केस लांब, उंची पाच फूट, चेहऱ्यावर तीळ असून, अंगात ग्रे सलवार व लाल कुडता परिधान केला आहे. ती सायन-पनवेल हायवे रोडवर उरण फाटा ब्रीजजवळ पोलिसांना मिळून आली आहे. या मुलीबाबत किंवा तिच्या नातेवाईकांबाबत कोणाला माहिती असल्यास सीबीडी पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक डुबल भ्रमणध्वनी ९८७०१३०३३५ येथे संपर्क साधावा.

# सततच्या पावसामुळे वीटभट्टीवाले हैराण

## कोरोना, वादळानंतर 'अवकाळी'मुळे होतेय नुकसान

**मोहोपाडा : रामप्रहर वृत्त**

राज्यात दोन दिवस पडलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान केले आहे. याचदरम्यान रसायनी, मोहोपाडा परिसरातही पडलेल्या पावसामुळे वीटभट्टी व्यावसायिकांचेदेखील मोठे नुकसान केले आहे.

नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून मोहोपाड्यातील वीटभट्टी व्यावसायिकांची लगबग सुरू झाली होती. यासाठी परतीचा पाऊस संपल्याबरोबर ऑक्टोबर महिन्यातच पूर्वतयारी करण्यात येते, पण याच काळात बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने पडलेल्या पावसामुळे वीटभट्टी व्यावसायिकांचे मोठे नुकसान झाले आहे.



(प्रातिनिधिक छायाचित्र)

अवकाळी पावसाचा फटका वीट उत्पादकांना बसला आहे. जांभा दगड बाजारात आल्यापासून वीटांची काही प्रमाणात मागणी घटली असताना कोरोना व वादळामुळे वीट व्यवसायावर मंदीचे सावट आले आहे. दिवाळी सणानंतर तालुक्यात वीट व्यावसायिकांनी वीटभट्टी लागणारा कच्चा माल घेऊन ऑर्डरप्रमाणे उत्पादनास सुरुवात केली. कच्च्या वीटा भट्टीवरती रचून ठेवल्या, परंतु अवकाळी पावसामुळे विटा व कच्चा माल यांचे जास्त प्रमाणात नुकसान झाले.

कोरोनाने आधीच कंबरडे मोडल्याने वीटभट्टी कामगारांच्या ससार उघड्यावर पडण्याची वेळ आली आहे. अशातच आता पडलेल्या अवकाळीमुळे व्यावसायिकाबरोबरच वीटभट्टी कामगारावरही संकट ओढावले अनेकाचा रोजगारावरदेखील पावसाने हिरावला आहे.

कोरोनानंतर सर्वच व्यवसाय खर्चात वाढ झाली असून यापूर्वी ८,५०० टनाने मिळणाऱ्या कोळशाचे दर बारा ते अठरा हजार प्रतिटनापर्यंत जाण्याचा अंदाज आहे. भाताचे तूस, माती, वाहतूक, मजुरी, वीज असा खर्च पाहता वीटभट्टी व्यावसायिक अवकाळी पावसामुळे चांगलाच अडचणीत आला आहे.

> *पावसातून झाकून वाचलेल्या विटा वाळत ठेवल्या असून, खराब झालेल्या विटांची माती झाली आहे. त्यामुळे अंदाजे सव्वा ते दीड लाखाचे नुकसान झाले असून अवकाळी पावसाचा फटका शेतकऱ्यांबरोबर वीटभट्टी व्यावसायिकांनाही बसला.*
> *-सुरेश म्हात्रे, वीटभट्टी व्यावसायिक*

> *अवकाळी पावसामुळे विटांचा व्यवसाय धोक्यात आला आहे. माझे कामगार लांबून वीटभट्टीवर कामाला येतात. कामगार एकदा जागेवर आले की त्यांना मजुरी देणे भाग आहे. अवकाळी पावसामुळे नुकसान भरपूर झाले आहे.*
> *-प्रसाद बारे, वीट उत्पादक*

## कामोठ्यात व्यापाऱ्यावर हल्ला करून लाखो रुपये लुटले

**पनवेल : वार्ताहर**

एका सोने खरेदी करण्यासाठी आलेल्या व्यापाऱ्यावर चार जणांनी हल्ला करून त्याच्याजवळ असलेली १८ लाखांची रोकड लुटून नेल्याची घटना पनवेलजवळील कामोठे बस थांब्याजवळ घडली आहे.

व्यापारी संतोष जाधव (वय ३८) यांची अंबेजोगाई येथे सोन्याची पेढी आहे. ते नेहमी मुंबई परिसरात येऊन सोन्या चांदीची खरेदी करून माल घेऊन जात असतात. अशाचप्रकारे ते मुंबई येथे सोने खरेदी करण्यासाठी एका खाजगी बसमधून येत होते. सकाळच्या वेळी ही बस कामोठे येथे थांबली होती. या वेळी चार अज्ञात व्यक्ती त्या बसमध्ये घुसल्या व त्यांनी त्यांच्याकडे असलेल्या धारधार वस्तूंनी जाधव यांच्यावर वार केले. त्यानंतर त्यांच्याजवळ असलेली १८ लाखांची रोकड घेऊन ते पसार झाले. यात जाधव हे जखमी झाले आहेत. या घटनेची माहिती कामोठे पोलिसांना मिळताच घटनास्थळी ते रवाना होऊन विविध पथके या आरोपींचा शोध घेण्यासाठी रवाना झाली आहेत.

## कामोठ्यात मोकळ्या भूखंडाची स्वच्छता; परिसरात वृक्षारोपण

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे येथील सेक्टर ३४ मधील एक प्लॉट घनदाट झाडी झुडपांमुळे वापरात नव्हता. याबाबत नगरसेवक विकास घरत यांनी पाठपुरावा करून या प्लॉटची स्वच्छता करून घेतली आहे. आता ज्येष्ठ नागरिकांसह मुलांना फिरणे, खेळण्यासाठी मोकळा झाला आहे. यासोबत या प्लॉटच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आल्याने आगामी काळात एक चांगली सावली या भागाला मिळणार आहे.

**नगरसेवक विकास घरत यांचा पाठपुरावा**



कामोठे येथील सेक्टर ३४ मधील प्लॉट नंबर ८७ ते ९० या मोकळ्या भूखंडावर मोठ्या खड्ड्यामुळे पाणी साचले होते. त्यामुळे दलदल आणि घाणीचे साम्राज्य निर्माण झाले होते. या साठलेल्या पाण्यामुळे दाट झुडपेदेखील वाढली होती. या मोकळ्या जागेत मोठ्या संख्येने उंदरांनी बिळे तयार केली होती. अधूनमधून साप दिसत होते. मच्छरांचे प्रमाण बेसुमार वाढले होते. त्यामुळे डास व इतर साथीच्या रोगांचा फैलाव होत होता. या सर्वांचा त्रास या रिकाम्या प्लॉट ला लागून असलेल्या शिवकृपा सोसायटी, तुलसी अवेन्यू सोसायटी, प्रगती हाइट्स, शिवगंगा सोसायटी, श्री गणेश अपार्टमेंट इत्यादी इमारतीमधील रहिवाशांना होत होता. या संदर्भात स्थानिक नागरिकांनी नगरसेवक विकास घरत व डॉ. अरुणकुमार भगत यांच्याकडे मागणी केली होती. त्यानुसार नगरसेवक विकास घरत यांनी भराव टाकून खड्डा बुजवून घेतला. एवढेच नव्हे तर जागेचे सपाटीकरणदेखील करून घेतले. संरक्षक कठडे बांधून घेऊन स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने वृक्षारोपणदेखील केले.

मैदानाअभावी मुलांना खेळण्यासाठी जागा होत नव्हती आता मात्र मुलांना या मोकळ्या जागेवर खेळण्यासाठी जागा निर्माण झाल्यामुळे मुलेदेखील खूश झाले आहेत, तसेच घाणीपासून सुटका झाल्यामुळे या परिसरातील रहिवासीदेखील आनंदी झाले आहेत. आबाल वृद्धांसाठी फिरणे, खेळण्यासाठी हा प्लॉट मोकळा करून घेण्यात आला. याबद्दल स्थानिक रहिवाशांनी नगरसेवक विकास घरत यांचे आभार मानले आहेत.





**पनवेल : भाजप केळवणे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्षपदी मंगेश वाकडीकर यांची आणि पोयंजे पंचायत समिती गण अध्यक्षपदी प्रवीण ठाकूर यांची निवड करण्यात आली आहे. आमदार महेश बालदी यांच्या हस्ते दोघांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. या वेळी गुळसुंदे जि. प. विभागीय अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, तालुका उपाध्यक्ष प्रवीण खंडागळे, सावळेचे सरपंच प्रशांत माळी, सदस्य सुनील माळी, कसळखंडचे माजी सरपंच अनिल पाटील, तालुका चिटणीस महेंद्र गोजे, युवा कार्यकर्ते योगेश कांबळे, महेंद्र पाटील, गणेश आगिवले, आशा म्हस्कर, सचिन दुर्गे आदी उपस्थित होते.**

## फूस लावून पळवून नेलेल्या मुलीची सुटका

**पनवेल : वार्ताहर**

कायदेशीर रखवालीतून अज्ञात कारणास्तव फूस लावून पळवून नेलेल्या एका अल्पवयीन मुलीला पनवेल शहर पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे शोधून काढले आहे.

करंजाडे वसाहतीत राहणारी एक अल्पवयीन मुलगी कुठेतरी निघून गेल्याची तक्रार किंवा तिचे अपहरण झाल्याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. पोलिसांच्या पथकाने अपहरण झालेल्या मुलीचा तांत्रिक तपास करून माहिती काढली. या वेळी ती मुलगी उल्हासनगर कॅम्प नं. ४ येथे असल्याबाबत माहिती मिळाल्याने पोलिसांनी त्या ठिकाणी जाऊन शोध घेतला. या वेळी मुलगी उल्हासनगर रेल्वे स्टेशन कॅम्प- ४ येथे मिळून आल्याने तिला ताब्यात घेण्यात आले आहे. याबाबत पुढील तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

## उरणच्या हर्षिता भोईरचा आणखी एक साहसी विक्रम

**उरण : प्रतिनिधी**

उरणच्या सात वर्षीय हर्षिता भोईर हिने ठाणे जिल्ह्यातला सर्वांत कठीण मानला जाणारा वजीर सुळका सर केला आहे. शिव अभ्यासक,



शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना श्रद्धांजली म्हणून हर्षिताने हे साहस केले आहे. वडील कविराज भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली हर्षिताने आजवर अनेक गड सर केले आहेत. वयाच्या पाचव्या वर्षी हर्षिताने १२ तासांत पाच गड सर करण्याचा विक्रम केला आहे.

या विक्रमाची नोंद वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड, एशिया बुक ऑफ रेकॉर्ड आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये आपली नोंद केली आहे. तर हिमाचलमधील फ्रेंडशीप पीक सर करण्याचा प्रयत्न केला आहे. या वेळी तिने १५ हजार ३०० फुटांचा बर्फातील ट्रेक करून, सर्वांची मने जिंकली होती. तर राज्यातील कठीण मानल्या जाणारे कालावंतीण गड, सैलबैला क्लाइम्ब, भैरवगड, गोरख गड हे देखील सर करून, सर्वांना चकित केले आहे.

ठाणे जिल्ह्यातील सर्वांत कठीण समजला जाणारा वजीर सुळका सर करून तिने शिवशाहीर, शिवाभ्यासक बाबासाहेब पुरंदरे यांना श्रद्धांजली वाहिली. वजीर सुळका सर करणारी ती सर्वात लहान मुलगी ठरली आहे. तिच्या या साहसी विक्रमाला एसएल ॲडव्हेंचर ग्रुप पुणे यांच्या लहू उघडे व त्यांचे सहकारी यांची उत्तम साथ मिळाली. तिच्या या साहासाबद्दल सर्व थरातून कौतुक केले जात आहे.

## पनवेल मनपा साकारणार खारघरमध्ये ट्राफिक पार्क

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेकडून खारघर येथे ट्राफिक पार्क हा प्रकल्प साकारण्यात येणार आहे. साडेनऊ हजार चौरस मीटर भूखंडावर हा प्रकल्प उभारण्यात येणार असून प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. लवकर निविदा प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येणार असल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले. विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच वाहतुकीचे नियम माहिती व्हावेत या अनुषंगान ट्राफिक पार्क होणार आहे. यासाठी १० कोटी रुपये खर्च येणार आहे.

खारघर येथे सेक्टर ३५ मधील प्लॉट क्रमांक ९ ए या जागेवर ९ हजार ४०७ चौरस मीटर भूखंडावर हा प्रकल्प उभारला जाणार आहे. याकरिता आसीम ब्रोकर्स हवर्स ही कन्सल्टंट एजन्सी नियुक्त करण्यात आली होती. त्यांनी याबाबतचा आराखडा तयार केला आहे. लवकरच निविदा प्रसिद्ध करून या कामाकरिता ठेकेदार नियुक्त करण्यात येणार आहे.

ट्राफिक पार्कमध्ये ५०० मीटर लांबीचा ड्रायविंग वे असेल त्याचबरोबर पाथवे सुद्धा तयार करण्यात येणार आहे. येथे चार सिग्नल बसवण्यात येतील. त्याचबरोबर झेब्रा क्रॉसिंग रम्बलरची सोय करण्यात येणार आहे. याव्यतिरिक्त शहर हॉस्पिटल, शाळा अग्निशमन दल यांचे सिम्बॉल येथे बसविण्यात येणार आहेत. ट्रॅफिक रिलेटेड लाईट या ठिकाणी बसविण्यात येणार आहे. जेणेकरून रात्रीच्या वेळी ही ट्राफिक पार्कमध्ये विद्यार्थी व नागरिकांना माहिती देता येईल.

खारघर येथे विकसित करण्यात येणाऱ्या ट्राफिक पार्कमध्ये प्ले झोन असणार आहे. येथे वाहतुकी संदर्भातील खेळणी बसविण्यात येणार असून त्या माध्यमातून मुलांना वाहतुकीच्या नियमांचे धडे दिले जाणार आहेत. येथे पिण्याच्या पाण्याबरोबरच शौचालय आणि इतर सुविधा विकसित करण्यात येणार आहेत.

## मानसशास्त्रज्ञ अनुराधा कारेगर यांचे आज व्याख्यान

**उरण : वार्ताहर**

गुड मॉर्निंग कट्टाच्या वतीने मानसशास्त्रज्ञ अनुराधा कारेगर (बालमानसोपचारतज्ज्ञ, वाडिया हॉस्पिटल, मुंबई) यांचे व्याख्यान उरण नगर परिषदेच्या विमला तलाव येथे सोमवारी (दि. २९) सकाळी ७.३० वाजता आयोजित करण्यात आले आहे.



हल्लीचे जीवनमान दगदगीचे, दडपणाचे, स्पर्धेचे झाले आहे. विद्यार्थी, पास नापास, मेरीट, ॲडमिशनच्या दडपणात वावरत आहेत. आई-वडील मुलांच्या शिक्षणाच्या, कर्जाच्या, परतफेडीच्या चिंतेत अडचणी, मुलामुलींच्या लग्नाच्या चिंता, सासुरवास, हुंडा जाच, विवाहबाह्य संबध, बेकारी, कर्ज समस्या असाध्य आजार, मानसिक चिंता, यामुळे नैराश्य, डिप्रेशन, मन मोकळेपणाचा अभाव, भीती न्यूनगंड, व्यसनाधिनता यावर योग्य सल्ला, मार्गदर्शन, मानसिक आधार न मिळाल्याने, आततायीपणाने आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढले आहे. आत्महत्या समस्येचा उपाय नाही. याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी व आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी नैराश्य दूर करण्यासाठी हे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

यासाठी सुबोध दर्णे, सूर्यकांत दांडेकर, उल्हास मोकाशी, प्रकाश पाटील, ॲड. पराग म्हात्रे, ॲड. मच्छींद्र घरत व सर्व सदस्यांचे सहकार्य लाभले.

## राज्यस्तरीय विज्ञान एकांकिका स्पर्धेची आज अंतिम फेरी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मराठी विज्ञान परिषदेने राज्यस्तरीय विज्ञान एकांकिका स्पर्धा सन २०२० आणि २०२१ ह्या कोरोना काळात शैक्षणिक गट वगळून फक्त खुल्या गटाकरिता ही स्पर्धा घेतली. प्राथमिक फेरीसाठी सहभागी संघांकडून एकांकिकेच्या चित्रफिती मागवल्या होत्या. त्या चित्रफिती पाहून त्यांचे परीक्षण करण्यात आले आणि अंतिम फेरीसाठी विज्ञान एकांकिका निवडण्यात आल्या. या वर्षीची अंतिम फेरी सोमवारी (दि. २९) सकाळी १० ते ५ या वेळत होईल. या विज्ञान एकांकिकांचे सादरीकरण वाशी येथील मराठी साहित्य व संस्कृती मंडळाच्या सभागृहात होणार आहे.

या वर्षी एकूण २४ प्रवेशिका आल्या होत्या. त्यामधे मुंबई शहर, मुंबई उपनगरे, नवी मुंबई, ठाणे, डोंबिवली, पुणे कोल्हापूर, नाशिक व नागपूर येथील संघानी भाग घेतला होता. परीक्षकांच्या निर्णयानुसार वेध अकॅडमी, डोंबिवली (मारीया); अर्बे स्टे, नागपूर (ॲनिमल कम्युनिकेटर); नवी मुंबई म्युझिक ॲड ड्रामा सर्कल (अपरिहार्य संतुलन); नलिनी यशवंतराव दोडे, विद्यालय मुलुंड-पूर्व (सर्व्हायव्हल इन्स्टिंक्ट); अमर हिंद मंडळ, दादर (एका बीजापोटी) या संघांची निवड अंतिम फेरीसाठी झाली.

अंतिम फेरीत विज्ञान एकांकिकांचे सादरीकरण झाल्यानंतर लगेचच मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात येईल.

## संपादकीय

# नवा विषाणू, पुन्हा धास्ती!

वैश्विक कोरोना महामारीचा प्रादूर्भाव कमी झाल्याचे सकारात्मक चित्र दिसू लागले असतानाच याच कोविड मालिकेतील नव्या विषाणूमुळे जगभरात एकच खळबळ उडाली आहे. तसे पाहिले तर याआधीही वेगवेगळे व्हेरियेंट आल्याचा नजीकचा इतिहास आहे, मात्र दक्षिण आफ्रिकेतील हा नवा प्रकार अधिक पटींनी घातक असल्याचे म्हटले जातेय. त्यामुळेच धास्ती वाढली आहे.

**कोरोनारूपी संकट मानवाची पाठ सोडायला तयार नाहीए. सलग जवळपास दोन वर्षे कोरोनाचा संसर्ग कमी-अधिक प्रमाणात जगभरात पाहावयास मिळत आहे. या काळात विविध देशांमध्ये कोरोनाच्या अनेक लाटा आल्या आणि त्यात अक्षरश: सारे काही वाहून गेले. आपल्या देशातही कोविड-१९ विषाणूच्या दुसर्‍या लाटेत धुमाकूळ घातला. यात अनेक जण उद्ध्वस्त झाले, तर कित्येकांना आपला जीवही गमवावा लागला, पण एवढी मोठी लोकसंख्या असूनही तिसरी लाट थोपविण्यात आपण यशस्वी ठरलो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखालील राबविण्यात आलेल्या जगातील सर्वांत मोठ्या लसीकरण मोहिमेला याचे श्रेय जाते. अर्थात, धोका पूर्णपणे टळलेला नाही. त्या दृष्टीने भारतासह सारेच देश खबरदारी घेत असताना ओमिक्रॉन नामक व्हेरिएंट भीती निर्माण करू लागला आहे. ओमिक्रॉनचा पहिला रुग्ण दक्षिण आफ्रिकेत आढळला. तसे पाहिल्यास आफ्रिका खंड यापूर्वीही अनेक रोगांचे उगमस्थान राहिलेला आहे. आता द. आफ्रिकेच्या गौतेंग प्रांतामध्ये नव्या विषाणूची लागण झाल्याची प्रकरणे समोर आली आहेत. याशिवाय बोस्तवाना आणि हाँगकाँगमध्येही रुग्ण आढळलेत. या सर्वांची दक्षिण आफ्रिकेतील प्रवासाची नोंद आहे. सर्वांत गंभीर बाब म्हणजे हा नवा विषाणू अल्फा, डेल्टापेक्षा कित्येक पटींनी घातक असून त्याचा प्रसार अतिशय वेगाने होतो. शिवाय यात एकूण ५० म्युटेशन असल्याचे अभ्यासक सांगतात. यावरून तो किती धोकादायक आहे याचा अंदाज येऊ शकतो. या पार्श्वभूमीवर अमेरिका, इंग्लंडसह इतर बड्या देशांनी आफ्रिकेतील विमानसेवा तात्पुरती बंद केली आहे. आपल्या देशातही खबरदारी म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी उच्चस्तरीय बैठक घेत अधिकार्‍यांना निर्देश दिले आहेत, तर राज्यातदेखील नवी नियमावली जारी करण्यात आली आहे. खरेतर नवा विषाणू किती भयंकर आहे आणि तो कसा परिणाम करू शकतो यावर संशोधन सुरू आहे. त्यामुळे याबाबत आताच्या घडीला थेट भाष्य करणे योग्य ठरणार नाही, पण कोरोनाचा पूर्वानुभव पाहता सतर्कता बाळगणे केव्हाही चांगले. कोरोनाला दूर ठेवण्यासाठी मास्क, सोशल डिस्टन्सिंग आणि स्वच्छता (हात धुणे) ही त्रिसूत्री आजही लागू आहे. मुख्य म्हणजे लसीकरण महत्त्वाचे आहे. अजूनही ज्यांनी कोरोनावरील लस घेतलेली नाही त्यांनी ती घेऊन स्वत:सह कुटुंबाला पर्यायाने समाजाला सुरक्षित करणे एव्हाना काळाची गरज बनली आहे. नवीन संकट आपण रोखू शकत नाही, पण अशा अनेक गोष्टी आहेत ज्या आपल्या हातात आहेत. सजग व जागरूक राहून वाटचाल केल्यास ज्या पद्धतीने आपण अलीकडे कोरोनाला थोपवण्यात यशस्वी झालो आहोत त्याचप्रमाणे या नव्या विषाणूवरदेखील निश्चितपणे मात करू शकतो. आपण पाहतो की कोरोनाचा आलेख खाली उतरल्यानंतर सार्वजनिक ठिकाणी नियमांचा फज्जा उडतो आहे. अनेक जण यातून आपलेच आरोग्य धोक्यात आणत आहेत. पहिल्यांदा ते थांबवले पाहिजे. शासन-प्रशासन उपाययोजना करीत आहेत, मात्र आपणही सुजाण बनून त्यांना साथ दिली पाहिजे.**

# मिनिट्रेनचा मार्ग दरडमुक्त



## खबरबात
**संतोष पेरणे**

ब्रिटिश काळात सुरू झालेल्या नेरळ-माथेरान-नेरळ या नॅरोगेजवर चालविल्या जाणार्‍या मिनीट्रेनचा मार्ग २००५ मध्ये माथेरान डोंगरात झालेल्या अतिवृष्टीनंतर धोकादायक बनला आहे. त्यानंतर पुढे सातत्याने या डोंगरात पावसाळ्यात दरवर्षी दरडी कोसळण्याच्या आणि माती, तसेच दगड खाली येण्याच्या घटना घडत आहेत. त्याचा परिणाम देशभरातील पर्यटकांची लाडकी नेरळ-माथेरान-नेरळ ही मिनीट्रेन पावसाळ्यात बंद ठेवावी लागते. तर गेली दोन वर्षे ही गाडी बंद ठेवावी लागली आहे. त्यामुळे मध्य रेल्वेकडून या मार्गावर कृषिरत्न शेतकरी शेखर भडसावळे यांच्याकडून जंगल, डोंगर आणि वणवे वाचविण्याचा प्रयोग राबविला जात आहे.

उन्हाळ्यात लागणारे वणवे ही मोठी समस्या बनत चालली असून कृषिभूषण शेतकरी शेखर भडसावळे यांनी वणवे रोखण्यासाठी जालीम उपाय शोधला आहे. २०१७ मध्ये त्यांचे प्रयोग तीन ठिकाणी यशस्वी ठरले असल्याने राज्य सरकारचा वन विभाग आता भडसावळे यांच्या सगुणा वनसंवर्धन टेक्निक सोबत काम करीत आहे. त्यामुळे तेथील वनसंपदा नष्ट होण्यापासून वाचली असून त्या टेकडीवर असलेल्या झाडांच्या आश्रयासाठी राहत असलेले पक्षी, प्राणी यांना आपले प्राण गमवावे लागले नाहीत, तर काहींना स्थलांतर करावे लागले नाही.

या वर्षी नेरळ फॉरेस्ट टेकडी, माणगाव टेकडी, जुम्मापट्टी टेकडी, टपालवाडी टेकडी, बेकरे टेकडी या भागात आपले लक्ष केंद्रित केले आहे. यातील माणगाव टेकडी आणि जुम्मापट्टी टेकडी परिसरात मोठ्या प्रमाणात आपल्या देशाचा राष्ट्रीय पक्षी मोर वास्तव्य करून आहे. त्या राष्ट्रीय पक्षाचे जतन आणि त्यांचा मंजुळ स्वर सदैव कानी पडावा हा हेतू घेऊन सगुणा वनसंवर्धन टेक्निक काम करीत आहे. याच भागातून माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी जाण्यासाठी पर्यटक नेरळ-माथेरान घाटरस्त्याने जात असतात. त्यामुळे त्या भागात वणवे लागणार नाहीत आणि पर्यटकांना निसर्ग संपदा वाचविली जात असल्याचा सुखद धक्का देण्यासाठी सगुणा वनसंवर्धन टेक्निक सिद्ध झाली आहे. २०१६ तसेच २०१७ मधील सगुणा वनसंवर्धन टेक्निकला मिळालेले यश पाहून वन विभागाचे राज्याचे प्रधान सचिव विकास खारगे यांनी शिरसे-कर्जत येथील टेकडीला भेट देऊन शेखर भडसावळे वनव्यांमुळे नष्ट होणारी आपली वनसंपदा वाचविण्यासाठी करीत असलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. त्याच वेळी त्यांनी वन विभागाला भेडसावत असलेला हा प्रश्न निकाली काढून वनसंपदा शाबूत ठेवण्यासाठी आपल्या वार्षिक कार्यक्रमात सगुणा वनसंवर्धन टेक्निकला स्थान दिले.

या वर्षी रायगड आणि ठाणे जिल्ह्यात हे टेक्निक वापरून काही ठराविक ठिकाणी जंगले वाचविण्याचा प्रयत्न वनविभाग करू पाहत आहे. तो यशस्वी झाल्यास पुढील वर्षी मोठ्या प्रमाणात हा प्रयोग सरकार करणार आहे. राज्याचे वनविभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हसकर यांनीही या कामाची पाहणी केली.

वणवे लागू नये यासाठी माथेरान परिसरातील आणि कर्जत शहराजवळील टेकड्यांवर सगुणा वनसंवर्धन टीमने ठराविक अंतरावर करवंदाची जाळी, रान वनस्पती यांची लागवड करून प्रयत्न केले आहेत.त्याच वेळी गवताला जागीच मारणारे ग्लायफोसेटची मात्रा देऊन जाळ पट्टे तयार केले आहेत. ते जाळ पट्टे यदाकदाचित वणवा लागला तर रोखू शकतात आणि पुढे जाणारी आग थांबवून जंगल जळण्यापासून वाचवू शकतात.

गेल्या चार महिन्यांपासून सुरू केलेल्या कामाला गालबोट लागू नये यासाठी सगुणा वनसंवर्धन टीमने आता हायटेक यंत्रणेची मदत घेतली आहे. ड्रोनच्या साहाय्याने सगुणा वनसंवर्धन टीमने वणवे रोखण्यासाठी केलेल्या डोंगर आणि टेकड्या यांचे फोटो सातत्याने घेतले जात आहेत. त्याच वेळी टीमचे सदस्य फोटो मिळवून त्यावर लक्ष ठेवण्याचे काम करीत आहेत.

सगुणा रूरल फाउंडेशनचे हे काम नेरळ-माथेरान रेल्वेच्या मार्गात जुम्मापट्टी भागात गेली चार पाच वर्षे सुरू आहे. रैवळ्याकडून देखील गेल्या काही वर्षात नेरळ-माथेरान रेल्वे मार्गात सतत होणारे भूस्खलन आणि लागणारे वणवे रोखण्यासाठी कोणते उपाययोजना कराव्यात यासाठी विचारमंथन सुरू आहे. त्यात सांगून फाउंडेशनकडून केलेल्या कामामुळे गेल्या काही वर्षात विशेषतः नेरळ येथील माणगाव टेकडी, टपालवाडी टेकडी जुम्मापट्टी टेकडी येथे दरडी कोसळण्याच्या घटना कमी घडल्या आहेत. त्यामुले मध्य रेल्वे प्रशासनाने प्रामुख्याने नेरळ-माथेरान मिनीट्रेनच्या मार्गावर दरडी कोसळू नये, तसेच या भागात डोंगरात भूस्खलन होऊ नये यासाठी सगुणा रूरल फाउंडेशनने काम करावे, अशी सूचना केली होती. त्यांनतर सगुणा रूरल फाउंडेशनचे प्रमुख आणि कृषी रत्न शेखर भडसावळे यांनी नेरळपासून अमन लॉज स्थानक या १८ किलोमीटरचा मार्ग रेल्वेच्या अधिकारी वर्गासह पायी चालून काढला. त्यानंतर या मार्गाच्या दोन्ही बाजूला काय करता येईल याची माहिती घेतली आणि जुलै २०२१ मध्ये सांगून रूरल फाउंडेशनकडून मिनीट्रेनच्या मार्गात काम सुरू करण्यात आले.

त्यांच्याकडून डोंगरातील माती कितीही पाऊस झाला तरी खाली येऊ नये यासाठी माती आणि दगडांना रोखून ठेवण्याचे काम करणारी झाडे वाला, करवंद, शिंदी, रानकेळी, तसेच निर्गुडी आणि घायपात यांची लागवड करण्याचे उद्दिष्ट शेखर भडसावळे यांनी समोर ठेवले. ती झाडे सगुणा रूरल फाउंडेशनकडून कशीही आणि कुठेही लावली जाणार नाहीत याची काळजी घेतली. मिनीट्रेनच्या नॅरोगेज मार्गाच्या डोंगर भाग असलेल्या भागात पाच मीटर अंतरावर ही झाडे उतारावर लावली गेली आहेत. दरीच्या भागात जशी जागा उपलब्ध आहे त्या स्वरूपात झाडे लावण्यात आली आहेत. या सर्व प्रकारच्या तब्बल २५००० झाडांची लागवड सांगून रूरल फाउंडेशनकडून करण्यात आली.

दरडी कोसळू नये आणि डोंगरात भूस्खलन होऊन माती आणि दगड खाली येऊन नुकसान होऊ नये यासाठी वाला ही वनस्पती चांगले काम करते हे सिद्ध झाले आहे. वाला ही वनसंपत्ती गवताच्या पाटीसारखी असते आणि उन्हाळ्यात ते झाड सुकले तरी त्या झाडाचा जमिनीमध्ये असलेला कांद हा मरत नाही. तो कांद पाणी आहे तोवर हे झाड सुकत नाही आणि पावसाळा सुरू झाला की पुन्हा आपले माती घट्ट धरून ठेवण्याचे काम सुरू करतो. तर करवंद या झाडाच्या जाळीमुळे माती आणि त्या झाडाच्या आजूबाजूचा परिसर कोणत्याही प्रकारचे भूस्खनन झाले तरी आहे तेथेच राहते. त्यामुळे करवंदाची जाळी नेरळ-माथेरान रेल्वे मार्गात सर्वत्र लावण्यात आली आहे. दुसरीकडे काँक्रिटचे जंगल वाढत असताना हरवत असलेली काळी मैना म्हणजे करवंदे देखील यापुढे माथेरानच्या डोंगरात खायला मिळू शकतात. शिंदी हे झाड माती पकडून ठेवतानाच कोरड्या असलेल्या भागात देखील जिवंत राहते. रानकेळी आणि निर्गुडी हे देखील घायपाताप्रमाणे मातीला पकडून ठेवण्याचे काम करतात. त्यामुळे नेरळ-माथेरान मिनीट्रेन मार्गावर २१ पैकी १८ किलोमीटर भागात ही सर्व झाडे सगुणा रूरल फाउंडेशनकडून लावण्यात आली आहेत.

त्यामुळे सांगून रूरल फाउंडेशनच्या या प्रकल्पामुळे भविष्यात नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेनचा मार्ग दरड मुक्त आणि भूस्खलनमुक्त होईल अशी आशा करूया. जेणेकरून तसे झाल्यास या मार्गावर चालविली जाणारी नॅरोगेज वरील सर्व पर्यटकांची लाडकी मिनीट्रेन पुन्हा नॅरोगेज मार्गावर येईल, त्यामुळे २००५ पासून नेरळ-माथेरान मार्गावर चालविल्या जाणार्‍या मिनीट्रेनला लागलेले ग्रहण कायमचे नष्ट होण्याची आशा करूया आणि सांगून रूरल फाउंडेशन, तसेच मध्य रेल्वे प्रशासनाला धन्यवाद देऊया.

# ऑनलाइन भातखरेदी नोंदणीच्या मुदतवाढीची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

शेतकर्‍यांना भातखरेदी केंद्रात आता भात विक्रीपूर्वी ऑनलाइन नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. यापूर्वी नोंदणीसाठी नोव्हेंबर ते मार्च असा पाच महिन्यांचा कालावधी ग्राह्य धरण्यात येत होता. या वर्षी ऑनलाइन भातनोंदणीची अंतिम तारीख ३० नोव्हेंबरपर्यंतच ठेवल्याने, तसेच ग्रामीण भागातील शेतकर्‍यांना नेटची समस्या असल्याने नोंदणीसाठी अडचणी येत आहेत. त्यामुळे ही मुदत वाढविण्यात यावी, अशी मागणी शेतकर्‍यांकडून करण्यात येत आहे.



(प्रातिनिधीक छायाचित्र)

अदिती अ‍ॅग्रो भातखरेदी केंद्र (खारआंबोली) संचालक दिनेश मिणमिने भात उत्पादक शेतकर्‍यांना आधारकार्ड, बँक पासबुक व सातबाराची झेरॉक्स प्रत घेऊन ऑनलाइन बुकिंगची माहिती गावागावात जाऊन सांगत आहेत. यंदा अवकाळी पावसामुळे अजूनही पानथळ जमिनीच्या शेतावर मळण्या (उडव्या) शेतातच पडून आहेत. ट्रक वा टेम्पोने भाताची वाहतूक होत नसल्याचे उंडरगावचे शेतकरी भारत नागुजी भोईर यांनी सांगितले.

तर ऑनलाइन भात खरेदीपूर्वी अवकाळी पावसात भिजलेल्या भाताचे शासकीय पातळीवर पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी जोसरांजणचे महादेव भांजी गायकर यांनी केली आहे. शासनाने पणन महामंडळातर्फे भातखरेदी केंद्र सुरू करून शेतकर्‍यांच्या भाताला वाजवी दर दिला असल्याने खाजगी व्यापार्‍यांकडून अल्पभावात खरेदीला आळा बसल्याने समाधान व्यक्त केले आहे.

# वडखळमध्ये मोबाइलचे दुकान फोडले

**पेण : प्रतिनिधी**

वडखळ येथील न्यू बालाजी मोबाइल शॉपीचे शटर तोडून चोरट्याने दुकानातील जवळ जवळ दीड लाख रुपये किमतीचे मोबाइल व ३० हजार रुपये रोख रक्कम लांबविल्याची घटना घडली आहे.

साजन म्हात्रे (रा. कांबळे आळी, ता. पेण) यांचे वडखळ येथे न्यू बालाजी मोबाइल शॉप व श्री सद्गुरू कृपा किराणा जनरल स्टोअर नावाचे दुकान आहे. शुक्रवारी (दि. २७)च्या रात्री अज्ञात चोरट्याने दुकानाचे शटर तोडून एक लाख ५० हजार ५०० रुपयांचे मोबाइल व रोख रक्कम ३० हजार रुपये असा एकूण एक लाख ८० हजार रुपयांची चोरी केली.

याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक भोर करीत आहेत.



(छाया : संजय करडे)

# मुरूडमध्ये संविधान दिन उत्साहात साजरा

**मुरूड : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब यांनी भारतीय राज्यघटना देशाला अर्पण केली, तेव्हापासून २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून ओळखला जातो. भारतीयांसाठी हा सोनेरी दिवस आहे, असे प्रतिपादन अ‍ॅड. विद्या देऊळकर यांनी शुक्रवारी (दि. २६) मुरुड येथे केले.

कोकण उन्नती मित्र मंडळाच्या मुरूडमधील वसंतराव नाईक महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाने शुक्रवारी आयोजित केलेल्या कार्यक्रमात अ‍ॅड. विद्या देऊळकर बोलत होत्या. संविधानाविषयी जनजागृती केली पाहिजे, असे मत त्यांनी या वेळी व्यक्त केले.

सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अ‍ॅड. मनाली सतविडकर, अ‍ॅड. फैसल जामदार, डॉ. मुरलीधर गायकवाड, डॉ. जनार्दन कांबळे यांची या वेळी समयोचित भाषणे झाली. डॉ. सुभाष म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ. श्रीशैल बहिरगुंडे, डॉ. मुरलीधर गायकवाड, डॉ. सीमा नाहिद, डॉ. नारायण बागुल यांच्यासह विद्यार्थी या वेळी उपस्थित होते. गजानन मुनेश्वर यांनी आभार मानले.

# राजपत्रित अधिकारी महासंघाची रायगड जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालयातील राजपत्रित वर्ग १ व २ च्या अधिकार्‍यांची ओळख तसेच महाराष्ट्र राजपत्रित अधिकारी महासंघाच्या जिल्हा समन्वय समितीचे पुनर्गठन या संदर्भातील महत्वाची बैठक नुकताच महासंघाचे संस्थापक व मुख्य सल्लागार ग. दि. कुलथे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात झाली.

या बैठकीत निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे यांची महासंघाच्या रायगड जिल्हाध्यक्षपदी तर जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांची सरचिटणीसपदी एकमताने निवड करण्यात आली. या वेळी महासंघाचे मुख्यालय सहसरचिटणीस सुदाम टाव्हरे, संघटक रमेश जंजाळ, बापूसाहेब सोनवणे तसेच विविध शासकीय विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

महासंघाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहत्रे, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सुभाष म्हस्के, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे (अलिबाग), आर. के. बामणे (महाड), जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्वला बाणखेले, जिपचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी भगवान घाडगे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी माधव सूर्यवंशी, महेश देवकाते, कामगार उपायुक्त प्रदीप पवार, जिल्हा कार्याध्यक्षपदी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले, सहकार्याध्यक्षपदी जिल्हा खनिकर्म अधिकारी रोशन मेश्राम, कोषाध्यक्षपदी डॉ. मनोजकुमार शेट्ये, सहकोषाध्यक्षपदी विकास बाबासाहेब खोळपे यांची निवड करण्यात आली. या बैठकीत अन्य नियुक्त्याही करण्यात आल्या.

# जादुई छूमंतर!

## नाट्यपरीक्षण

कल्पना करा... जर घराघरांत प्रत्येकाला आपले पूर्वजन्म आठवू लागले तर... गेल्या जन्मातील मित्र या जन्मात शत्रू असेल आणि गेल्या जन्मातील शत्रू या जन्मात मित्र, गेल्या जन्मातील घरासमोरचा रस्त्यावरील भिकारी या जन्मात भाऊ असेल, तसेच गेल्या जन्मातील आपली आई या जन्मात मित्राची आई असेल किंवा गेल्या जन्मातील आपली बायको या जन्मात शेजारच्याची बायको असेल, तर... काय गडबड गोंधळ होईल ना...!

असाच काहीसा गडबड गोंधळ 'छूमंतर' या नाटकात होतो. प्रा. वसंत कानेटकर यांनी लिहिलेले हे नाटक नव्या संचात आणि नव्या ढंगात रंगमंचावर आणले आहे निर्माती श्वेता पाटील यांनी. दिग्दर्शक राजा अत्रे यांनी तितक्याच ताकदीने ते उभे केले आहे. जवळ जवळ चाळीस वर्षांपूर्वीचे जुन्या पिढीतील हे नाटक पुन्या नव्या संचात रंगमंचावर आणणे म्हणजे शिवधनुष्य पेलण्यासारखे आहे आणि हे दिग्दर्शक राजा अत्रे यांनी लीलया पेलले आहे. त्याला तितक्याच समर्थपणे कलाकारांनी साथ दिली आहे.

सरदार चिमाजी आप्पा यांच्या पहिल्या पत्नीचे निधन होऊन चाळीस वर्षे झाली आहेत. त्यांनी दुसरे लग्नही केले आहे, पण तरीही पहिल्या बायकोची पुण्यतिथी ते आठवणीने करतात. याही वर्षी ते नेहमीप्रमाणे शास्त्रीबुवांकडून पूजा करवून घेत आहेत, पण शास्त्रीबुवांचे पूजेत लक्ष नाही. याबाबत चिमाजी अप्पांनी त्यांना विचारले असता आप्पांच्या पहिल्या बायकोचा पुनर्जन्म झालेला आहे, असे ते सांगतात आणि इथूनच सुरुवात होते धम्माल, अनाकलनीय प्रसंगांना... चिमाजी आप्पा आपल्या गेल्या जन्मातील बायकोला भेटण्याची इच्छा व्यक्त करतात. शास्त्रीबुवा मंत्र मारून ती जिथे कुठे असेल तिथे तिची गेल्या जन्मातील आठवण जागी करतात. त्याबरोबर आप्पांचा नातू पोपट याची प्रेयसी अनुराधाच आप्पांची पहिली बायको राधा बनून अवतरते आणि वाड्यात सराईतपणे वावरू लागते. त्यामुळे मात्र आप्पांचा मुलगा आणि पोपटचे वडील बाळासाहेब, आई मनकर्णिका, आप्पांची दुसरी बायको माईसाहेब या सर्वांमध्ये एक गोंधळ निर्माण होतो. हे सारे जण आणि वाड्याचा हिशेब पाहाणारे आबाकाका या सार्‍याला विरोध करण्याचा प्रयत्न करतात. शास्त्रीबुवांना सांगून यावर उपाय करत असताना मंत्र उलटा पडून पोपट, बाळासाहेब, मनकर्णिका हेही त्यांच्या गतजन्मात जातात. मग मात्र गोंधळात आणखी भर पडते आणि यात चिमाजी आप्पाही भरडले जातात. नाटक अनपेक्षित वळणे घेत पुढे सरकते. मग पुढे काय होते? शास्त्रीबुवा यातून मार्ग काढतात का? सगळे परत या जन्मात येतात का? आप्पांना त्यांची पहिली बायको राधा मिळते का? पोपट आणि अनुराधाचे काय होते? या सर्व प्रश्नांची उत्तरे नाटकातूनच प्रत्यक्ष मिळवणे आणि ते सारे प्रत्यक्ष अनुभवने हा एक अनोखा अनुभव ठरेल.

छूमंतर हे नाटक दोन तास खुर्चीला खिळवून ठेवते. पुढे काय होणार याची हूरहूर सतत पाहणाराला लागून राहाते. क्षणाक्षणाला सभागृहात हास्याचे स्फोट होतात. प्रा. वसंत कानेटकर यांच्या सिद्धहस्त लेखनीतून उतरलेले हे नाटक तितक्यात सहजपणे कलाकारांनी सादर केले आहे. प्रेक्षकांना हे नाटक काही काळ वेगळ्याच दुनियेत घेऊन जाते. यातील 'स्वराज्यरक्षक संभाजी' आणि 'ती परत आलीय'फेम देवेंद्र सरदार यांचा चिमाजी आप्पा, राधा व अनुराधा झालेली स्नेहा पाटील धमाल आणतात. त्याला तितक्याच समर्थपणे साथ दिली आहे शास्त्रीबुवा झालेल्या सचिन पोळेकर यांनी. त्याचबरोबर बाळासाहेब (ऋषिकेश पिंगळे) आणि मनकर्णिका (स्नेहल तटकरे) हेही अफलातून वावरले आहेत. पोपट झालेल्या साहिल परबने भूमिकेत मजा आणली आहे. त्यांना आप्पांच्या दुसर्‍या पत्नी माईसाहेब (दर्शना कुलकर्णी-सरदार) आणि आबाकाका (प्रमोद कार्ले) यांनी उत्तम साथ दिली आहे. अल्पकाळासाठी आलेले घारूअण्णा (हृषिकेश गणेश घाग) आणि नेमिनाथ (वैभव परदेशी) आपली छाप सोडून जातात. एकंदरीतच छूमंतरचा मंत्र लागू पडला आहे आणि सारे तंत्र जमून आले आहे.



नाटकाचे नेपथ्य गणेश घरकर यांनी अगदी नेटके केले आहे. कमीत कमी साहित्यातून त्यांनी उत्तम सेट उभा केला आहे. वेशभूषा आणि रंगभूषा ही बाजू उल्हेश खंदारे यांनी उत्तम सांभाळली आहे. प्रसाद अत्रे यांची प्रकाशयोजनाही नेत्रसुखद आहे. नाटकाला पार्श्वसंगीत देताना शिवम लिंगायत यांनी अधेमधे नवीन गाण्यांचा तडका देऊन एक वेगळीच चव आणली आहे. त्यांचे 'भिगे ओठ तेरे', 'माटा माटा गो' या गाण्यांनी रंगत आणली आहे. त्यामुळे हे नाटक जुन्या पिढीबरोबरच नवीन पिढीलाही तितकेच आपले वाटेल. निर्मात्या श्वेता पाटील यांनी व्ही. बी. एन्टरटेन्मेंटद्वारे हे नाटक रसिकांसमोर आणले आहे.

कोरोना काळातून सारे बाहेर पडत असताना हे हलके फुलके विनोदी नाटक आपल्या डोक्यातील सार्‍या चिंता, काळज्या काही काळासाठी विसरायला लावते. छूमंतर एक निखळ विनोदी नाटक आहे. आपली सद्सद्विवेक बुद्धी आणि सारासार विवेक नाट्यगृहाच्या बाहेर ठेऊनच आत जायचे आणि छूमंतर या कल्पनाविष्काराचा मनमुराद आनंद घ्यायचा. नाट्यगृहाच्या बाहेर येताना एका वेगळ्याच जगातून परत आल्याचा अनुभव प्रत्येकाला आल्याशिवाय राहात नाही. त्यामुळे केवळ नाट्यप्रेमीच नाही तर प्रत्येकाने हे नाटक पाहावे असे झाले आहे.

**-संदीप बोडके (९९२०३३३८४३)**

# माणगाव नगरपंचायत भाजप स्वबळावर लढणार

## ■ निरीक्षक कृष्णा कोबनाक यांची माहिती

**माणगाव : प्रतिनिधी**

येणाऱ्या २१ डिसेंबरला माणगाव नगरपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली असून ही निवडणूक भाजप स्वबळावर लढणार असल्याची माहिती पक्षाचे माणगाव नगरपंचायत निवडणुकीचे निरीक्षक कृष्णा कोबनाक यांनी माणगाव येथे पक्ष कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

माणगाव नगरपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाल्याने या निवडणुकीबाबत पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांची आढावा बैठक रविवारी (दि. २८) दुपारी माणगाव येथे पक्ष कार्यालयात निवडणुकीचे निरीक्षक कृष्णा कोबनाक व पक्षाचे प्रदेश सरचिटणीस रविभाऊ मुंढे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला भाजपचे तालुकाध्यक्ष संजयआप्पा ढवळे, समन्वय समितीचे माजी अध्यक्ष नाना महाले, तालुका सरचिटणीस योगेश सुळे, उमेश साटम, जिल्हा उपाध्यक्ष प्राजक्ता शुक्ला, तालुका उपाध्यक्ष यशोधरा गोडबोले, तालुका महिला मोर्चा अध्यक्षा शर्मिला सत्वे, युवा मोर्चा जिल्हा चिटणीस चिन्मय मोने, तालुका युवा मोर्चा अध्यक्ष विशाल गलांडे, माणगाव शहराध्यक्ष राजू मुंढे, बाबुराव चव्हाण, संजय जाधव, गोविंद कासार, युवा शहर सचिव स्वप्नील भिलारे, अरुण पेणकर, युवा शहराध्यक्ष राजेश तेटगुरे आदी उपस्थित होते.



(छाया : सलीम शेख)

या आढावा बैठकीनंतर पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माणगाव नगरपंचायत निवडणुकीचे भाजपचे निरीक्षक कृष्णा कोबनाक यांनी सांगितले की, माणगावमधील आमच्या पक्षाच्या प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक झाली. या बैठकीत आम्ही माणगाव नगरपंचायतीच्या सर्व १७ जागा स्वबळावर लढविण्याचे ठरविले आहे. माणगाव नगरपंचायत निवडणूक जाहीर झाल्यापासून आजतागायत आमच्याकडे कोणाचा आघाडीबाबतचा प्रस्ताव आलेला नाही. आला तर वरिष्ठ पातळीवर त्याचा निर्णय घेतला जाईल.

माणगाव शहराची परिस्थिती आपण सारी मंडळी पाहत आहोत. आजही स्थिती जैसे थे अशीच आहे. विकासकामांच्या दृष्टीने कोणतेही चांगले काम झालेले दिसत नाही. शहरातील अनधिकृत बांधकामे, स्वच्छता, आरोग्य हे सारे प्रश्न असून या ठिकाणी चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध झालेल्या दिसत नाहीत.

याच मुद्द्यावरून आपण निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. भाजपची आजही देशात व राज्यात ताकद आहे.आम्ही या वेळेस निश्चितच माणगाव नगरपंचायतीत शिरकाव करण्याचा प्रयत्न करणार आहोत.

# रायगड जिल्ह्यात २४ एसटी कर्मचारी सेवेतून बडतर्फ

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात कामावर न येणाऱ्या एसटी कामगारांवर महामंडळाने कडक कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. यानुसार रोजंदारी वर्ग १च्या तब्बल २४ कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे. ७० कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आले आहे, तर १०३ कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. कारवाईच्या बडग्यानंतर आतापर्यंत ८८० कर्मचारी कामावर रूजू झाले असून चार दिवसांत वेगवेगळ्या मार्गांवर १६० फेऱ्या झाल्यात.

रायगड जिल्ह्यातील एसटी कर्मचाऱ्यांचा संप रविवारी (दि. २८) २२व्या दिवशीदेखील सुरू आहे. सर्व कर्मचाऱ्यांवर कारवाई झाली तरी बेहत्तर आम्ही मागे हटणार नाही, अशी भूमिका सर्व आठ आगारांतील कर्मचाऱ्यांनी घेतली आहे. त्यामुळे ग्रामीण भागाची जीवनवाहिनी ठप्प आहे. दरम्यान, पेण, महाड, श्रीवर्धन, माणगाव, रोहा या आगारात काही चालक-वाहक हजर झाल्याने तेथून काही बसेस दररोज सोडल्या जात आहेत. जे कर्मचारी हजर झाले नाहीत त्यांच्यावर कारवाईची मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. चालककम वाहक अशी सेवा करणारे १४० रोजंदारी कर्मचारी आहेत. त्यांच्यापैकी २४ जणांच्या नोकरीवर या आंदोलनामुळे गदा आली आहे. त्यांना सेवेतून मुक्त करण्यात आले आहे.

**८८० कर्मचारी कामावर हजर**

> **कर्मचाऱ्यांनी सेवेत पुन्हा हजर व्हावे यासाठी आमचे सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत, तर कामावर हजर न होणाऱ्या कर्मचाऱ्यांवर आता कडक कारवाई करण्यात येत आहे. कर्मचाऱ्यांनी कामावर हजर होऊन कारवाई टाळावी.**
>
> **-अनघा बारटक्के, रायगड विभाग नियंत्रक**

दररोज हा आकडा वाढतो आहे. जिल्ह्यातील आठ आगारांत जवळपास अडीच हजार कर्मचारी सेवेत आहेत. त्यांच्यापैकी ८८० कर्मचारी कामावर हजर झाले असल्याचा दावा महामंडळाने केला आहे. त्यात प्रशासकीय २६०, कार्यशाळेतील २९०, तर चालक-वाहक मिळून ३३० जणांचा समावेश आहे.

# डिकसळमध्ये थँक्यू आंबेडकर सेल्फी पॉईंट

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील डिकसळ शांतीनगर येथील शांतिदूत मंडळाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी थँक्यू आंबेडकर असा सेल्फी पॉईंट बनविण्यात आला आहे. संविधान दिनाचे औचित्य साधून या सेल्फी पॉईंटचे शुक्रवारी (दि. २६) अ‍ॅड. गौतम गायकवाड यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.




(छाया : संतोष पेरणे)

शांतीदूत मंडळातर्फे शुक्रवारी भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. या वेळी डिजिटल बॅनरचे उद्घाटन करण्यात आले. अ‍ॅड. कैलास मोरे, सिद्धार्थ सदावर्ते, आकाश कांबळे, उमरोली ग्रामपंचायतीच्या माजी उपसरपंच भारती पाटील, सदस्य तेजस भासे, अ‍ॅड. उत्तम गायकवाड, किशोर गायकवाड, राजू चव्हाण, सचिन गायकवाड, भारतीय बौद्ध महासभेचे उपासक रमेश गायकवाड, उपासिका हिराताई हिरे, शारदाताई वाघमारे, रेखा गायकवाड, संगीता गायकवाड, शोभा चव्हाण, तनुजा गायकवाड, मंडळाचे अध्यक्ष निखिल गायकवाड, सचिव प्रमोद वाघमारे, नितीन गायकवाड, प्रशिक गायकवाड, सागर ब्राह्मणे, मनोज गायकवाड, प्रमोद चव्हाण, विजय पवार, प्रणव गायकवाड आदी या वेळी उपस्थित होते.

# जनतेच्या सहकार्याशिवाय पोलीस काम करू शकत नाही -पोलीस अधीक्षक अशोक दुधे

**खोपोली : प्रतिनिधी**

पोलीस दलात विविध समस्या असो, क्राईम असो की सामाजिक-सार्वजनिक काम असो हे करीत असताना जनतेचे सहकार्य मिळाल्याशिवाय आमचे काम यशस्वी करू शकत नाही, असे गौरवोद्गार रायगड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी काढले. गणेशोत्सव काळात घेतलेल्या विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण कार्यक्रम नुकताच युके रिसॉर्ट येथे झाला. त्या वेळी अशोक दुधे बोलत होते.

खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल विभूते यांनी रायगड पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्या मार्गदर्शनाखाली गणेशोत्सव काळात कोरोना मुक्ती संदेश सजावट, स्वच्छ गाव, डासमुक्त, गणपती आगमन ते विसर्जन मिरवणूक, लसीकरण, मास्क वापरणे, सॅनिटाईझरचा वापर करणे, समाजात जनजागृती करण्याबाबत खालापूर पोलीस ठाणे अंतर्गत गावात स्पर्धा आयोजित केली होती. त्याचप्रमाणे विविध सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सार्वजनिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते यांचा गुणगौरव कार्यक्रम आयोजित केला होता. चक्रीवादळ, आपत्ती काळ, कोरोना काळात गाव दत्तक घेऊन त्यांना मदत करणे, आदिवासी भागात कोरोना लसीकरण करून घेणे, गुन्ह्याची तत्काळ उकल करणे याचा आवर्जून उल्लेख पोलीस अधीक्षक यांनी आपल्या भाषणात केला.




उपविभागीय अधिकारी अजित नैराळे यांनीही पोलीस खात्याच्या कर्तव्याची जाण ठेऊन सामाजिक उपक्रम राबविले जातात याबद्दल कौतुक केले. या वेळी अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, तहसीलदार आयुब तांबोळी, खोपोली पोलीस निरीक्षक शिरीष पवार, सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र सकपाळ, पोलीस पाटील संघटना अध्यक्ष अनंत ठोंबरे-पाटील, सामाजिक संस्था गुरुनाथ साठेलकर, सहज फाउंडेशनचे डॉ. शेखर जांभळे आदींसह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

# पथनाट्य कलाकारांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मान

## आदिवासी स्थलांतर रोखण्यासाठी जिल्ह्यातील पहिला पथदर्शी प्रकल्प

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबाचे स्थलांतर रोखण्यासाठी व त्यांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून बाहास माला सालंमा धाड (बाबा मला शाळेत पाठवा) या पथनाट्याचे प्रयोग ठिकठिकाणी सादर करण्यात येत आहेत. या पथनाट्याला व कलाकारांना जिल्हाधिकारी व मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन नुकतेच गौरविण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आदिवासींसाठी आयोजित जनजागृती कार्यक्रमात या पथनाट्यातील सर्व कलाकारांना जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

या पथनाट्याचे लेखन सुधागड तालुक्यातील दर्यागाव येथील प्राथमिक शाळेचे शिक्षक राजू बांगारे यांनी, तर दिग्दर्शन पाच्छापूर शाळेचे शिक्षक अनिल राणे यांनी केले आहे. या पथनाट्य गटाचे अध्यक्ष दत्ता वाघमारे व सचिव रोहिदास हिलम आहेत. नारायण हंबीर, दामू शिद, विशाल वाघमारे, महादू वारगुडे, ज्ञानेश्वर वारगुडे, कमलाकर शिंदे, मोरेश्वर कांबळे, सतिश खानेकर, जनार्दन भिलारे, दीपक दंत, बजरंग बेलोसे, कमलाकर तांडेल, राम संकाये, भगवान दंत व साई बांगारे इत्यादी कलाकार हे पथनाट्य सादर करतात.



(छाया : धम्मशील सावंत)

रायगड जिल्ह्यातील आदिवासींचे कामासाठी परराज्यात व जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात स्थलांतर होते, मात्र कामाच्या ठिकाणी त्यांचे शोषण होते. शिवाय तेथे त्यांना वेठबिगाऱ्याप्रमाणे वागवले जाते. यातून त्यांचे व मुलाबाळांचे आर्थिक, मानसिक व शैक्षणिक नुकसान होते. परिणामी एकात्मिक आदिवासी विकास विभाग प्रकल्प पेण विभागाच्या प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव यांच्या सहकार्याने आणि सुधागड तालुका तहसीलदार दिलीप रायण्णावार यांच्या संकल्पनेतून मागील वर्षभरापासून जिल्ह्यात हा उपक्रम राबविला जात आहे.

# पद्मदुर्ग किल्ल्यात स्वच्छता मोहीम

(छाया : संजय करडे



**मुरूड : प्रतिनिधी**

पद्मदुर्ग जागर व संवर्धन समितीच्या सदस्यांनी मुरूडमधील पद्मदुर्ग किल्ल्यात नुकतीच स्वच्छता मोहीम राबविली. किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळील व आतील ढासळलेल्या पायऱ्यांची या वेळी दुरुस्ती करण्यात आली.

ऐतिहासीक पद्मदुर्ग (कासा) किल्ल्यात दरवर्षी पावसाळ्यानंतर मोठ्या प्रमाणात झाडी व गवत उगवते, त्यामुळे पर्यटकांना किल्ला फिरणे अडचणीचे होते. म्हणून पद्मदुर्ग जागर व संवर्धन समितीचे सदस्य नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यात किल्ल्यात स्वच्छता मोहीम राबवतात. समितीच्या सदस्यांनी या वेळी किल्ल्यात वाढलेले गवत, झाडी-झुडपे काढून टाकली.

कासा किल्ल्याचे दोन भाग आहेत. एक मुख्य किल्ला आणि त्यासमोरील पडकोट. पडकोट मोठ्या प्रमाणावर नामशेष होत आला आहे. समितीच्या कार्यकर्त्यांनी तेथीलही स्वच्छता केली. विशेष म्हणजे पुरातत्त्व खात्याकडून अजूनही किल्ल्याची साफसफाई सुरू झालेली नाही.

पद्मदुर्ग जागर व संवर्धन समितीचे अध्यक्ष अशील ठाकूर, उपाध्यक्ष संकेत आरकशी, सचिव राहुल कासार, खजिनदार योगेश सुर्वे, सदस्य सुनील शेळके, विजय वाणी, महेंद्र मोहिते, रूपेश जामकर, बाबू घरत, पप्पा माने यांच्यासह इतर सदस्य, तसेच गडप्रेमी या स्वच्छता मोहिमेमध्ये सहभागी झाले होते.

# जीवनातील नाती सांभाळत आरोग्य सांभाळा -डॉ. मेघा घाटे

**अलिबाग : प्रतिनिधी**

संचालक मंडळ हायस्कूल नागाव व आधार संस्था ह्यांच्या संयुक्त विद्यमाने नागाव हायस्कूल येथे वयात आलेल्या मुली व त्यांच्या मातांसाठी मोफत आरोग्य मार्गदर्शन व शिबिर आयोजण्यात आले होते. या शिबिराचा लाभ ८८ विद्यार्थिनी व २० मातांनी घेतला. या सर्व महिला, तसेच विद्यार्थिनींची तपासणी अलिबागच्या स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. मेघा घाटे यांनी केली.



या शिबिरात मुलींना त्यांच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी, दैनंदिन जीवनात व्यायामाचे महत्त्व, तसेच आपली नाती कशी जपावी याविषयी डॉ. मेघा घाटे यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा परिषद रायगडचे विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे प्रमुख पाहुणे होते. 'आपला जिव्हाळा'चे अध्यक्ष विकास पिंपळे यांचा शिबिर आयोजनात मोलाचा वाटा होता.

आधार संस्थेचे अध्यक्ष निलेश म्हात्रे, नागाव हायस्कूलचे मुख्याध्यापक ए. जी. पाटील, शिक्षिका वर्षा पाटील, नमिता नाईक, सावंत, बनकर, पाटील मॅडम, चोरघे सर, सुशील जाधव, कासार सर, मोहन पाटील, सिद्ध कॉटेजचे मालक व जयश्री हॉस्पिटलच्या डॉ. दीपाली पाटील व परिचारिका नम्रता भगत यांचे या वेळी सहकार्य लाभले तसेच नागाव हायस्कूलच्या कर्मचारी वर्गाने मोलाचे सहकार्य केले.

# आकुर्ले येथे कोरोना लसीकरण शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषद क्षेत्रातील आकुर्ले परिसरातील स्थानिक नगरसेविका प्राची डेरवणकर यांनी कोविड-१९ प्रतिबंध लसीकरण शिबिराचे आयोजन केले होते. यामध्ये १६४ जणांनी लसीकरण करून घेतले.

उपजिल्हा रुग्णालय कर्जत आणि कर्जत नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आकुर्ले येथील विश्वकर्मा मंदिरात लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी उपस्थित होत्या.

उपजिल्हा रुग्णालयाच्या डॉ. संगीता दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य सेविका पूनम पाटील, केवल वारीक यांनी लसीकरण केले. त्यांना नगर परिषद कर्मचारी शाहीन मुजावर, प्रतीक्षा सिंग यांनी सहकार्य केले.

(छाया : विजय मांडे)



# महिला बचत गटांच्या विविध वस्तूंची विक्री व प्रदर्शन

**पेण : प्रतिनिधी**

अभियान उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अंतर्गत तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष व पेण पंचायत समिती यांच्या मार्गदर्शनाखाली अंतोरे एकता महिला ग्राम संघाच्या २१ महिला बचत गटांनी एकत्रित येऊन बनवलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. या वेळी सरपंच अमित पाटील, सदस्य राजेश कांबळे, ग्रामसेवक प्रविण पाटील, पं. स. प्रभाग समन्वयक शीतल म्हात्रे, प्रीती पाटील, अंतोरे, सीआरपी गटाच्या अध्यक्षा सरिता पाटील, नमिता म्हात्रे, सविता डंगर, प्रगती कोळी, ग्रामसंघाच्या अध्यक्षा सप्तमी थळे, शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण बैकर, राजेंद्र पाटील, सामाजिक कार्यकर्ते संजय थळे, राजेश मनोरे, संदेश पाटील आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.



(छाया : अनिस मनियार)

**जाहीर प्रसिद्धीकरण**

पुढे नमूद केलेल्या सहकारी संस्थांचा सन २०२१ ते २०२६ या कालावधीतील पंचवार्षिक निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध करण्यात येत आहे. संस्थांची नावे-१. ज्ञानेश्वर माऊली नागरी सहकारी पतसंस्था मर्या., पनवेल, २. आधार महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या., कळंबोली. सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. ३०-११-२०२१ ते ०६-१२-२०२१, नामनिर्देशन पत्र छाननी दि. ०७-१२-२०२१, नामनिर्देशन माघारी दि. ०८-१२-२०२१ ते २२-१२-२०२१ व आवश्यकतेनुसार मतदान दि. २७-१२-२०२१ रोजी घेण्यात येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सूचना व अधिक माहिती संस्थेचे कार्यालयात व तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, पनवेल, सुशिला निवास, मिडलक्लास हौसिंग सोसा. पनवेल यांचे कार्यालयात पहावयास मिळेल. तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
(दत्तात्रय धायगुडे)
निवडणूक निर्णय अधिकारी

सही/-
(निता पुगांवकर)
निवडणूक निर्णय अधिकारी

# पहिली कसोटी रंगतदार अवस्थेत

## भारताच्या अय्यर, साहाची झुंजार फलंदाजी; चौथ्या दिवसअखेर न्यूझीलंडचा सलामीवीर माघारी

**कानपूर : वृत्तसंस्था**

कानपूरच्या ग्रीनपार्क स्टेडियमवर सुरू असलेल्या न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या कसोटीत भारताने आपल्या दुसऱ्या डावाची घोषणा केली. चौथ्या दिवशी वरची फळी ढेपाळल्यानंतर श्रेयस अय्यर, वृद्धिमान साहा यांच्या अर्धशतकांच्या जोरावर भारताने आपला दुसरा डाव ७ बाद २८३ धावांवर घोषित केला. न्यूझीलंडने आपल्या दुसऱ्या डावातील फलंदाजीला सुरुवात केली असून टॉम लॅथम आणि विल यंग यांनी सलामी दिली, मात्र फिरकीपटू रवीचंद्रन अश्विनने यंगला (२) पायचीत पकडले. यंगनंतर नाईट वॉचमन विल सोमरविले मैदानात आला आहे. चौथ्या दिवसअखेर न्यूझीलंडने १ बाद ४ धावा केल्या आहेत. पाचव्या दिवशी पाहुण्या संघाला २८० धावा कराव्या लागणार आहेत.

न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज काईल जेमीसनने भारताचा सलामीवीर शुबमन गिलला (१) स्वस्तात माघारी धाडले. त्यानंतर चेतेश्वर पुजारा आणि मयंक अग्रवाल यांच्याकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती, पण तेसुद्धा अपयशी ठरले. जेमीसनने पुजाराला (२२) पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. त्यानंतर टिम साऊदीने पुन्हा एकदा भेदक गोलंदाजी करीत मयंकला (१७) आणि रवींद्र जडेजाला एकाच षटकात बाद केले. ५१ धावांत ५ गडी गमावल्यानंतर श्रेयस अय्यर आणि रवीचंद्रन अश्विन यांनी थोडा आधार दिला. या दोघांनी संघाची धावसंख्या शतकीपार केली. जेमीसनने अश्विनला बोल्ड करत ही भागीदारी मोडली. अश्विनने ३२ धावांचे योगदान दिले.



त्यानंतर चहापानापर्यंत श्रेयसने लढा दिला. त्याने आठ चौकार आणि एका षटकारासह ६५ धावांची खेळी केली. साऊदीने श्रेयसचा काटा काढला. श्रेयस बाद झाल्यानंतर यष्टीरक्षक फलंदाज वृद्धिमान साहा न्यूझीलंडसमोर उभा राहिला. त्याने अर्धशतकी खेळी करत भारताची आघाडी वाढवली. साहाने आधी श्रेयससोबत व नंतर अक्षर पटेलसोबत अर्धशतकी भागीदारी रचली. ८१ षटकात ७ बाद २८३ धावांवर भारताने आपला दुसरा डाव घोषित केला. साहाने चार चौकार आणि एका षटकारासह ६१, तर पटेलने २८ धावांची नाबाद खेळी केली. न्यूझीलंडकडून साऊदी आणि जेमीसन यांनी प्रत्येकी तीन बळी घेतले.

भारताने २८०+ धावांची आघाडी घेताना 'किवीं'समोर मोठे आव्हान उभे केले आहे. आतापर्यंत भारतात चौथ्या डावात पाहुण्या संघाला २८०+ धावांच्या लक्ष्याचा एकदाही पाठलाग करता आलेला नाही. १९८७मध्ये वेस्ट इंडिजने दिल्ली कसोटीत व्हिव्हियन रिचर्ड्स यांच्या नेतृत्वाखाली ५ बाद २७६ धावा करून विजय मिळवला होता.

## भारताच्या द. आफ्रिका दौऱ्यावर कोरोनाचे सावट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कोरोनाच्या ओमिक्रॉन या नव्या उत्परिवर्तित प्रकाराचे (व्हेरियंट) जगभर भय पसरले आहे. जगातील अनेक देशांनी दक्षिण आफ्रिका प्रवासावर बंदी घातली आहे. दक्षिण आफ्रिकेचे सरकारही हाय अलर्टवर गेले आहे. बाहेरून येणाऱ्या प्रवाशांची कोविड तपासणी केली जात आहे. अशा परिस्थितीत टीम इंडियाचा आगामी दक्षिण आफ्रिका दौरा धोक्यात येताना दिसत आहे.

टीम इंडियाला १७ डिसेंबरपासून दक्षिण आफ्रिकेत तीन कसोटी, तीन एकदिवसीय आणि चार टी-२० सामन्यांची मालिका खेळायची आहे. भारताचा अ संघ सीनियर संघापूर्वीच तिथे गेला आहे. जिथे त्यांना चार दिवसांत तीन सराव सामने खेळायचे आहेत. सीनियर संघात निवडलेल्या अनेक खेळाडूंना भारत अ संघात स्थान मिळाले आहे.

जगभरातील सर्व देश दक्षिण आफ्रिकेच्या प्रवासावर बंदी घालण्याचा विचार करीत आहेत. टीम इंडिया डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात दक्षिण आफ्रिकेला रवाना होणार आहे, मात्र या दौऱ्याबाबत आता अनिश्चितता निर्माण झाली आहे.

### केंद्रीय क्रीडामंत्री म्हणतात...

या पार्श्वभूमीवर केंद्रीय क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, कोरोनाच्या अशा परिस्थितीत प्रत्येक बोर्डाने मग ते बीसीसीआय असो किंवा इतर कोणीही असो त्यांनी भारत सरकारची परवानगी घ्यावी. त्यांच्याकडून अर्ज आल्यावर सरकार निर्णय घेईल. बीसीसीआयने आम्ही परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत आणि क्रिकेट दक्षिण आफ्रिकेच्या संपर्कात आहोत, असे म्हटले आहे.

# खो-खो निवड चाचणी स्पर्धेत गोरेगाव, हाशिवरे संघांनी मारली बाजी





### खेलो इंडिया युथ गेम्स

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या वतीने खेलो इंडिया युथ गेम्सकरिता जिल्हास्तर खो-खो निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन अलिबाग नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुल या ठिकाणी करण्यात आले होते. या स्पर्धेत मुलांच्या गटामध्ये संत रोहिदास तरुण मंडळ गोरेगाव, तर मुलींच्या गटात महात्मा गांधी विद्यालय हाशिवरे यांनी बाजी मारली.

स्पर्धेचे उद्घाटन राष्ट्रीय खो-खो खेळाडू व निवड समिती सदस्य श्रीनिवास मेतरी यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनवेळी रायगड जिल्हा खो-खो असोसिएशनचे उपाध्यक्ष बब्रुवाहन गायकवाड, सहसचिव पुरुषोत्तम पिंगळे, तालुका क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर, निवड समिती सदस्य लावण्य मगर, जिल्हा संघटनेचे पंच व तांत्रिक अधिकारी उपस्थित होते.

मुलांमध्ये पहिला उपांत्य सामना वायुदूत क्रीडा मंडळ कळंबोली विरुद्ध संत रोहिदास तरुण मंडळ गोरेगाव यांच्यात झाला. या सामन्यात गोरेगाव संघ एक डाव व सात गुणांनी विजय झाला, तर दुसरा उपांत्य सामना महात्मा गांधी विद्यालय हाशिवरे विरुद्ध जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र पनवेल या संघांमध्ये झाला. या सामन्यात हाशिवरे संघाने क्रीडा प्रशिक्षण केंद्र संघाचा १६-१७ अशा अवघ्या एक गुणाच्या फरकाने पराभव केला.

अंतिम सामन्यात गोरेगाव संघाने हाशिवरे संघावर एक डाव व पाच गुणांनी विजय मिळविला. या सामन्यामध्ये गोरेगाव संघाच्या प्रथमेश बामनोलकर व मंदार शिंदे या खेळाडूंनी अष्टपैलू कामगिरी केली, तर हाशिवरे संघाकडून अथर्व पाटील याने उत्तम खेळाचे प्रदर्शन केले. मुलांमध्ये विभागीय निवड चाचणीसाठी वेदांत सुरेंद्र पाटील, अथर्व आदेश पाटील (दोघे हाशिवरे), संतोष वांद्रे (कळंबोली) अंकित साकेत क्रीडा प्रशिक्षक केंद्र (पनवेल), यश विकास चांगले (साने गुरुजी विद्यानिकेतन) या खेळाडूंची निवड करण्यात आली.

मुलींच्या गटात अंतिम सामना महात्मा गांधी विद्यालय हाशिवरे व संत रोहिदास मंडळ गोरेगाव या संघामध्ये झाला. या सामन्यात हाशिवरे संघाने उत्कृष्ट कामगिरी करीत गोरेगाव संघावर एक डाव व एक गुणाने विजय मिळवला. या वेळी हाशिवरे संघांच्या ईशा उदय पाटील व भूमिका गुरुनाथ पाटील यांनी उत्तम खेळाचे प्रदर्शन केले. मुलींमध्ये विभागीय निवड चाचणीसाठी गोरेगाव संघातील नंदिनी टेब, रिया पालकर, भूमी बैकर, निर्जला शिर्के, आयेशा टॅब या खेळाडूंची निवड करण्यात आली.

स्पर्धेतील विजेत्या संघांचे, तसेच निवड झालेल्या खेळाडूंचे जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक व जिल्हा संघटनेचे सचिव आशिष पाटील यांनी विशेष अभिनंदन केले व पुढील स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या.


या स्पर्धेसाठी पंच व सामनाधिकारी म्हणून राकेश म्हात्रे, सुधीर पाटील, विशाल शिंदे, अनिकेत पाटील, कल्पेश पाटील यांनी काम पाहिले, तर स्पर्धेच्या यशस्वितेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड जिल्हा खो-खो असोसिएशनचे पदाधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## आरोग्य प्रहर

### व्यायामामुळे अल्झायमरसारख्या आजारांचा धोका होऊ शकतो कमी

शारीरिक व्यायाम करणे आपल्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. हे वयानुसार मेंदूच्या संरचनेचे आणि कार्याचे संरक्षण करण्यास मदत करतो. यामुळे अल्झायमरसारख्या मेंदूशी संबंधित समस्यांचा धोका कमी होऊ शकतो.

अभ्यासाच्या निष्कर्षांनुसार शारीरिक हालचालींमुळे मेंदूच्या रोगप्रतिकारक पेशींची क्रिया बदलते आणि मेंदूतील सूज कमी होते. मेंदूमध्ये मायक्रोग्लिया नावाच्या विशिष्ट रोगप्रतिकारक पेशींचा एक वर्ग असतो. हे मेंदूच्या ऊतींचे कोणतेही नुकसान किंवा संसर्गाचे निरीक्षण करतो आणि निरुपयोगी पेशी काढून टाकतो.



मायक्रोग्लिया इतर पेशींना संदेश पाठवणाऱ्या तंत्रिका पेशी (न्यूरॉन्स)च्या निर्मितीमध्येही थेट सहभागी आहेत. हे कार्य न्यूरोजेनेसिस नावाच्या प्रक्रियेद्वारे होते, परंतु मायक्रोग्लियाला त्यांचे कार्य करण्यासाठी सुप्तावस्थातून सक्रिय करणे आवश्यक आहे. रोगजनक विषाणू किंवा खराब झालेल्या पेशींचे सिग्नल मायक्रोग्लिया सक्रिय करते. हे त्यांचे आकार बदलते आणि भरपाई करण्यास मदत करते.

मायक्रोग्लियादेखील अयोग्यरीत्या सक्रिय केले जाऊ शकते. कारण वय सरल्यामुळे मेंदूमध्ये सूज येऊ शकते आणि न्यूरोजेनेसिसची प्रक्रिया रोखली जाऊ शकते. वयोमानानुसार मेंदूच्या कार्यावर परिणाम होण्यामागे सूज येणे हेही एक कारण आहे आणि अल्झायमरसारख्या समस्यांमध्ये हे बदल अधिक घातक ठरू शकतात. या अभ्यासात १६७ पुरुष आणि महिलांनी भाग घेतला. या अभ्यासाचा उद्देश वृद्ध लोकांच्या मेंदूच्या आरोग्यावर परिणाम करणारे घटक दर्शविण्याचा आहे. संशोधकांनी सहभागींच्या मेंदूतील सिनॅप्टिक प्रथिनांच्या पातळीचेही निरीक्षण केले. ही प्रथिने तंत्रिका पेशींमधील लहान बंध असतात जिथे माहिती प्रसारित केली जाते. अभ्यासातील काही सहभागींचे मृत्यूनंतरच्या शवविच्छेदनाच्या दरम्यानदेखील विश्लेषण करण्यात आले आणि असे आढळून आले की सुमारे ६१ टक्के सहभागींच्या मेंदूमध्ये अल्झायमरची चिन्हे होती. यावरून हे स्पष्ट होते की मृत्यूनंतर एखाद्याला अल्झायमर रोगाची लक्षणे दिसत असली तरी ती व्यक्ती जिवंत असताना संज्ञानात्मक अशक्तपणाची प्रमुख लक्षणे दर्शवेल असे आवश्यक नाही.

अभ्यासातील तरुण सहभागी सर्वसाधारणपणे शारीरिकदृष्ट्या आणि मानसिकदृष्ट्या अधिक सक्रिय असल्याचे दिसून आले. हे सूचित करते की शारीरिक व्यायाम मेंदूतील येणाऱ्या सुजेमुळे होणारे हानिकारक प्रभाव कमी करण्यास मदत करतात.

## सिंधू उपांत्य फेरीत गारद

**बाली : वृत्तसंस्था**

भारताची दोन ऑलिम्पिक पदकविजेती बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूला सलग तिसऱ्या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पराभव पत्करावा लागला. इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत शनिवारी उपांत्य फेरीच्या सामन्यात तिला माजी विश्वविजेत्या थायलंडच्या रॅटचॅनोक इन्टानॉनने पराभूत केले. पुरुष दुहेरीत सात्विक साइराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टीचेही आव्हान संपुष्टात आले.

तिसऱ्या मानांकित सिंधूचा महिला दुहेरीच्या उपांत्य फेरीत दुसऱ्या मानांकित इन्टानॉनने २१-१५, ९-२१, १४-२१ असा पराभव केला. सिंधूने झुंज दिली, पण इन्टानॉनने तिच्यापेक्षा दर्जेदार खेळ करीत विजयाची नोंद केली.





**पनवेल : रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊन व गार्डन व्हॉलिबॉल लीग यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन पनवेल सेक्टर ११ येथे रविवारी व्हॉलिबॉल टुर्नामेंट आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट दिली. त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी त्यांनी आयोजकांचे कौतुक करून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. रोटरी क्लब पनवेल पालिका प्रेसिडेंट गुरुदेवसिंग कोहली, व्ही. सी. म्हात्रे, शेखर पन्हाळे, किसन पवार, चारुदत्त भगत, प्रकाश पाटील, श्रीनिवास कोडुरू, आनंदराव पाटील, राजेंद्र सोनावणे, तसेच गार्डन व्हॉलिबॉल लीगचे सभासद या ठिकाणी हजर होते.**

# जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत बोरीचामाळ संघ विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील श्री गणेश क्रीडा मंडळ सागवाडी यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय आदिवासी कबड्डी स्पर्धेत पेण तालुक्यातील बोरीचामाळ संघाने विजेतेपद पटकावले. अलिबाग तालुक्यातील वाघजाई संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. बोरीचामाळ संघाचा राजेंद्र दोरे याला पब्लिक हीरो म्हणून गौरविण्यात आले.

ठाकूर, आदिवासी, धनगर, समाजासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. जिल्ह्यातील पेण, रोहा, पाली, मुरूड व इतर तालुक्यातील ४२ संघ स्पर्धेत सहभागी झाले होते. अंतिम सामन्यात बोरीचामाळ संघाने वाघजाई संघाचा पराभव केला. तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पाटवाडी अलिबाग संघाने मिळवले. भोमोली अलिबागने चतुर्थ क्रमांक मिळवला. बेलवाडी रोहा व वाघोडे अलिबाग यांनी अनुक्रमे पाचवा व सहावा क्रमांक मिळवला. बोरीचामाळ संघाचा राजेंद्र दोरे याला उत्कृष्ट पकडीचे पारितोषिक देण्यात आले. त्यालाच पब्लिक हीरो म्हणून गौरविण्यात आले. वाघजाई संघाचा निखिल लोभी याला उत्कृष्ट चढाईचे पारितोषिक देण्यात आले.

### राजेंद्र दोरे पब्लिक हीरो



स्पर्धेचे उद्घाटन नियोजन समिती सदस्य संतोष निगडे यांच्या हस्ते करण्यात आले. भाजप ओबीसी सेल अलिबाग तालुका अध्यक्ष अशोक वारगे, भाजप तालुका उपाध्यक्ष नितीन गुंड, उपतालुका प्रमुख संदेश पालकर, रामराज विभागप्रमुख पृथ्वीराज पाटील, युवासेना तालुकाप्रमुख अजय गायकर, विभाग संघटक अमित म्हात्रे, उपविभाग प्रमुख महेश शिंदे, बोरघर ग्रामपंचायत सदस्य जनार्दन भगत, सामाजिक कार्यकर्ते जयंत थळे आणि ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.





**पनवेल : गौरी स्पोर्ट्स नेवाळी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन रविवारी भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. उद्घाटन समारंभास पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, तसेच राजेश काथारा व अन्य उपस्थित होते. या वेळी अरुणशेठ यांनी मैदानात उतरून जोरदार फटकेबाजी केली.**



दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com